कर्नाटक सरकार

# मराठी सरिता

## तृतीय भाषा पाठ्यपुस्तक
## Marathi Third Language

## Part - 2

# 8

## इयत्ता आठवी

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

**Karnataka Textbook Society (R)**
6th Cross, Malleshwaram
Bangalore 560003

Z3G5K7

## गद्यविभाग


| अ.क्र. | पाठाचे नाव | लेखकाचे नाव | साहित्य प्रकार | मूल्य | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|---|---|
| 6 | आमच्या मुलांची शाळा! | मिर्जी अण्णाराव | बोधकथा | जीवन शिक्षण | 1 |
| 7 | आमचंही जरासं ऐका | संकलित | संवाद | पर्यावरण जागृती | 9 |
| 8 | भेट | लक्ष्मण लोंढे | विज्ञान कथा | कुतूहल | 13 |
| 9 | चिंगीचा पराक्रम | ना.धो. ताम्हणकर | ललित गद्य | विनोद निर्मिती | 21 |


## पद्यविभाग


| अ.क्र. | कवितेचे नाव | कविचे नाव | साहित्य प्रकार | मूल्य | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|---|---|
| 14 | प्राजक्ताची फुले | मंगेश पाडगावकर | निसर्ग कविता | निसर्गप्रेम | 27 |
| 15 | पुस्तके | सफदर हाश्मी | मुक्तछंद | ज्ञान | 31 |
| 16 | बाप | प्रशांत बागूल | भावकविता | पितृप्रेम | 35 |
| 17 | आगगाडी आणि जमीन | कुसुमाग्रज | संवाद काव्य | गर्वहरण | 38 |
| 18 | ज्योत | वि. म. कुलकर्णी | वैचारिक कविता | परोपकार | 46 |
| 20 | **पूरकवाचन** | | | | 58 |
| 21 | **ओळख तंत्रज्ञानाची** | | | | 59 |
| 23 | **खरा देव** | | | | 65 |
| 24 | **वाढदिवस** | | | | 69 |


@KTBS NOT TO BE REPUBLISHED

# 6 आमच्या मुलांची शाळा!

- मिर्जी अण्णाराव

A8X1X7

**परिचय :**

मिर्जी अण्णाराव (1918-1975) जन्म बेळगाव जिल्हयातील शेडबाळ येथे. शिक्षक, स्वातंत्र्यसैनिक आणि प्रसिद्ध कन्नड साहित्यिक, राष्ट्रपती पुरस्कार, 1970 मध्ये साहित्य आकादमी पुरस्कार प्राप्त झाले आहेत. राजा मंगळवेढेकर यानी खालील कथा मराठीत अनुवादित केली आहे.

श्रेष्ठ भारतीय बालकथा: संपादक बाबा भांड यांच्या पुस्तकातून ही कथा घेतली आहे.

## (मूल्य - जीवन शिक्षण)

''अरे अनंत, हे काय चाललंय? तू तर सतत सूत कातत असतोस. लिहिणं- वाचणं केव्हा करणार?''

मल्लण्णाने आपल्या मुलाला विचारले, अनंत सहाव्या इयत्तेत शिकत होता.

''गुरुजींनी आज मला सूत कातायला सांगितलंय. उद्या आम्ही विणणार आहोत. त्यासाठी सूत बनवायला सांगितलंय'' चरख्यावर सूत कातता कातता अनंतानं सांगितलं.

शाळेत सूत कशासाठी कातायचं? आम्हाला याची काय गरज आहे ? लिहा वाचा, हिशेब बिशेब करा. एवढं पुष्कळ आहे.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED




आमची मूलभूत शिक्षण देणारी बुनियादी शाळा आहे. अशा शाळेत सूत कातणे, विणणे, सुतारकाम, शेती सगळं शिकवलं जातं. अनंतानं आपल्या वडिलांना समजावलं.

''उगाच जास्ती बडबड करू नकोस. मी उद्या तुझ्या शाळेत येऊन गुरुजींशी बोलेन.'' मल्लण्णा म्हणाला.

मल्लण्णाची समजूत अशी होती की, सूत कातून विणून हे कोणी आपल्याला विणकर बनवू पाहात आहेत, म्हणून तो दुसऱ्या दिवशी अनंताच्या शाळेत गेला. अनंताची शाळा गावाच्या बाहेर एका टेकडीवर होती. चोहोबाजूला बाग होती. फुले-फळे, भाजीपाला तसंच काही धान्यही तिथं पेरलेलं होत.

शाळा पाहून मल्लण्णा खूष झाला. आत जाऊन गुरुजींना भेटला.

''या मल्लण्णा'' गुरुजींनी त्याचं स्वागत केलं. ते म्हणाले, फार दिवसांनी आलात, आपल्या मुलाच्या शिक्षणाकडंही कधी कधी लक्ष दिलं पाहिजे? मल्लण्णाला वाटलं की आपली शंका व्यक्त करण्याची हीच वेळ आहे. तो हलकेच म्हणाला, सूत कातणं, विणणं, सुतारकाम, शेतीकाम इत्यादी आपण शाळेत शिकवू लागला आहात. यातून आमच्या मुलाचा काय फायदा होणार?

ठीक! मल्लण्णा, आपण विचारत आहात ही चांगली गोष्ट आहे. चला आपण शाळेत चक्कर टाकून येऊया. आपल्या मुलाची शिक्षणपद्धतीही पाहू शकाल. गुरुजी म्हणाले.

मग गुरुजी मल्लण्णाला घेऊन शाळेत गेले. शाळेत फिरू लागले. म्हणाले, हे आमच्या शाळेचे प्रार्थना मंदिर आहे. तिथे महापुरुषांच्या तसबिरी लावलेल्या आहेत. बुद्ध, बसव, येशू, पैगंबर, महावीर, नानक, राम-कृष्ण सर्व इथं आहेत. समोर शारदा आहे. प्रत्येक तसबिरीच्या खाली त्या त्या महापुरुषांची श्रेष्ठ उक्ती लिहिलेली आहे.

मल्लण्णानं ते सर्व पाहिलं. बसवेश्वराच्या तसबिरीखाली 'कर्म हाच कैलास आहे' असे लिहिले होते, तसेच बुद्धाच्या तसबिरीखाली 'जगा आणि जगू द्या' असं लिहिलं होतं. पुढं जाताना गुरुजी म्हणाले, इथं आम्ही सर्व मुलांच्या बरोबर प्रार्थना करतो. मल्लण्णा, हा काळा फळा पाहा. यावर आमची मुलं रोज त्या दिवसाचं पंचांग लिहितात. आजची ग्रहगती, दिनतिथी, सूर्योदय आणि सूर्यास्ताची वेळ लिहितात. हे सर्व त्यांना ठाऊक असतं. त्याचबरोबर जगातील घटना वार्ताही असतात. देश-विदेशातील घटना लिहिल्या जातात. पाहा, हा वार्ताफलक आहे. यावर रोज एक सुभाषित लिहून त्याचा अर्थ सांगितला जातो. रोज राष्ट्रगीत म्हटले जाते.

मल्लण्णानं आश्चर्यानं विचारलं, हे सगळं आपण रोज करता? नाही, हे सर्व मुलं करतात. आमची त्यांना साथ असते. त्यांना आम्ही मार्गदर्शन करतो. पूर्वतयारीसाठी मदत करतो. नंतर गुरुजींनी मल्लण्णाला मूल शिक्षणाच्या विभागात नेलं. तिथं मुलांनी बनविलेले कपडे दाखविले. आमच्या मुलांनी हे सगळं विणलं आहे. मल्लण्णा विचारात पडला.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

तिथं ठिकठिकाणी वैज्ञानिक विषयांसंबंधी फलक लावलेले होते. इतिहासाचे फलक, भूगोलाचे नकाशे इ. काळ्या फलकावर मुलांनी गणित केले होते. मल्लण्णानं हे सगळं पाहिलं. त्यानंतर ते शाळेच्या बागेत आले. तिथं मल्लण्णांनी पाहिलं की, कितीतरी तऱ्हेच्या भाज्या आहेत. एक गुरुजी, मुलांना कोणत्या पिकाची कशी पेरणी केली पाहिजे, त्यासाठी माती कशी हवी? इत्यादी माहितीपर व्याख्यान देत होते. शेतकरी मल्लण्णा हे सगळं पाहून फारच खूष झाला. पुढं विद्यार्थ्यांना सुतारकामाचं शिक्षण दिलं जात होतं. तेही त्यानं पाहिलं.

पण त्याच्या मनातला प्रश्न तशाच्या तसाच राहिला होता. मुलांना हे व्यावसायिक शिक्षण शाळेत कशासाठी दिले जात आहे? लिहिणं वाचणं गणित, इतिहास इ. विषय कुठे गेले! गुरुजींनी त्यांना समजावून सांगितलं, मल्लण्णा, शाळेत शिकविण्यासाठी काही उद्योगांची आम्ही निवड केली आहे. हे आमच्या देशातील 'मूल उद्योग' आहेत. यांच्या साहाय्याने मुलांना विषयाचे ज्ञान करून दिले जाते. याचे प्रमुख तत्त्व आहे, 'करा आणि शिका' मुलांच्या मधील क्रियाशीलतेचा उपयोग करून त्यांना काही विषयांचे शिक्षण दिले जाते.

मल्लण्णा म्हणाला, मला आपलं बोलणं समजलं नाही?

मल्लण्णा ऐका, आम्ही मुलांना कपाशीच्या संबंधी सांगतो ती कुठल्या मातीत उगवू शकते. तिच्यासाठी हवा कशी पाहिजे, पाणी किती पाहिजे, माती कशी असावी इ. गोष्टी समजावून सांगतो. त्याचबरोबर रुईची सफाई देखील चाललेली असते. अशा प्रकारे मुलांना भूगोलाचे शिक्षण दिले जाते. त्यानंतर ती मुलं पुस्तक वाचून त्यासंबंधी अधिक गोष्टी शिकतात. यामुळे मुलांमधील क्रियाशीलता जागृत राहाते. इतर विषयदेखील अशाच तऱ्हेने मूल उद्योगाशी जोडून शिकविले जातात. हे चांगलं नाही का?

खरी गोष्ट आहे. व्यवसायाबरोबर त्यासंबंधीचे ज्ञानही मिळते.

मल्लण्णा, आपण डोळ्याने पाहतो, कानाने ऐकतो, नाकाने वास घेतो, हाताने स्पर्श करतो, जीभ स्वाद चाखते, ही इंद्रियज्ञान मिळविण्याची साधनेच नाहीत का? इंद्रिय ज्ञानाची शक्ती वाढवणं म्हणजेच शिक्षण होय. या शिक्षण पद्धतीत इंद्रियांचा उपयोग अधिक होत असतो.

वा! पूर्वी आम्हाला फक्त लिहिणं वाचणं आणि ऐकणं एवढंच शिकविलं जात असे.

गुरुजी म्हणाले, मल्लण्णा इतकंच नव्हे तर या. शिक्षणपद्धतीमुळे मुलांच्या ठायीचा आत्म विश्वासही वाढतो. मुलांना वाटू लागतं, मी केवळ लिहिलंच नाही, तर शिकलोही आहे. मी काहीतरी उत्पन्न केले. त्याचीही काही किंमत आहे.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

हे खरं आहे जीवनात याची फारच आवश्यकता आहे. मल्लण्णाने दुजोरा दिला.

यामुळंच या पद्धतीला ‘जीवन शिक्षण’ म्हणतात. गुरुजी म्हणाले.

ठीक, माझा मुलगा जीवन शिक्षणाच्या शाळेत शिकतो आहे तर!

हां हां, इथं प्रत्येक आपापल्या उद्याच्या जीवनासाठी तयार होतो आहे. इथं आम्ही सण समारंभही साजरे करतो. गावातील सभा-समारंभात आमची मुलं भाग घेतात. त्यांना मदत करतात. श्रमदान करतात. छोट्या छोट्या यात्रा भरवतात आणि या सगळ्यात मिळून-मिसळून लिहिणं-वाचणं इ. शिकतात. विश्रांतीमधूनही खूप शिकतात. ‘करतात आणि शिकतात.’ जगत वाढत शिकतात. देशासाठी प्रकाश बनून जगणं शिकतात. काय हे पुरेसं नाही? वा! वा! याहून अधिक आम्हाला काय पाहिजे? मल्लण्णानं खुश होऊन गुरुजींना प्रणाम केला. आपल्या मुलाची शाळा पाहिली, आनंद झाला आणि तो घरी परतला.

मल्लण्णाला फार आश्चर्य वाटलं. शाळेत मुलं सूत कातताात, गणित शिकतात, रुई कपाशीचं वजन करतात, त्याचा हिशेब करतात. त्याचबरोबर विज्ञानाचे प्रयोगही करतात आणि शिकतात. या सर्व कामाशी तन्मय होऊन लिहिणं-वाचणं गणित इ. चांगल्या तऱ्हेनं जाणून घेतात. ही एक नवीन पद्धती आहे. चांगली रीत आहे. या विचारानं भारूनच तो घरी पोचला. तो फारच खुश झाला होता. माझ्या मुलाची शाळा ही जीवन शिक्षण शाळा आहे! असं तो स्वतःशीच वरचेवर म्हणत होता!

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

## नवीन शब्दार्थ :

| | | |
|---|---|---|
| सूत कातणे | - | कापसापासून धागा तयार करणे |
| मूलभूत | - | प्रमुख |
| बुनियादी | - | पायाभूत |
| व्यावसायिक शिक्षण | - | उद्योगधंद्याविषयी शिक्षण |
| कपाशी | - | कापूस, रुई |
| क्रियाशीलता | - | कार्य करण्याची उर्मी |
| तन्मय होणे | - | समरस होणे. |

# अभ्यास

**प्र.1. खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

1) अनंत कोणत्या इयत्तेत शिकत होता?
2) अनंतच्या शाळेत कोणत्या प्रकारचे शिक्षण दिले जाते ?
3) अनंतची शाळा कोठे होती?
4) प्रार्थना मंदिरात कोण कोणत्या महापुरुषांच्या तसबिरी लावल्या होत्या ?
5) मल्लण्णा वरचेवर काय म्हणत होता?

**प्र.2. खालील प्रश्नांची उत्तरे दोन-तीन वाक्यात लिहा.**

1) अनंतच्या शाळेत काय काय शिकविले जाते ?
2) श्री बसवेश्वर आणि बुद्धाच्या तसविरीखाली काय लिहिले होते?
3) बागेत गुरुजी मुलांना काय शिकवित होते ?

**प्र.3. खालील प्रश्नांची पाच-सहा वाक्यात उत्तरे लिहा.**

1) प्रार्थना मंदिरातील काळ्या फळ्याचा उपयोग कशाप्रकारे केला जातो?

**प्र.4. रिकाम्या जागा भरा.**

1) अनंत … … … … … वर सूत कालत होता.
2) कर्म हाच … … … … … आहे.
3) जगा आणि … … … … … द्या.
4) अनंतच्या वडिलांचे नांव … … … … … होते.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

**टिपा :**

1) **जीवन शिक्षण शाळा :** अशाप्रकारच्या शाळेत व्यवसायाभिमुख शिक्षण दिले जाते विद्यार्थी प्रत्यक्ष काम करण्याचे शिक्षण मिळवितात

2) **कर्म हाच कैलास :** कर्नाटकातील प्रसिद्ध संत धर्मसंस्थापक श्री बसवेश्वर यांच्या 'कायकवे कैलास' या प्रसिद्ध कवनाचा मराठी अनुवाद

3) **जगा आणि जगूद्या** : जगातील प्रत्येकाला जगण्याचा अधिकार आहे असे सांगणारा गौतम बुध्दाचा उपदेश

**उपक्रम :**

1) माझी शाळा या विषयावर 15-20 ओळी निबंध लिहा.
2) तुमच्या शाळेतील एका दिवसाचा वृत्तांत लिहा.
3) जवळच्या व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या संस्थेस भेट द्या.
4) ‘जीवन शिक्षण शाळा’ याबद्दल अधिक माहिती मिळवा.



## चला थोडे हसूया

### सामान्य ज्ञान

आपल्या छोट्या भाच्याचे सामान्यज्ञान पाहण्यासाठी मामांनी प्रश्न केला - लागोपाठ, दोन दिवस पाऊस पडू शकतो का नाही? सांग बरं.

‘‘मुळीच नाही’’ भाच्याने आत्मविश्वासाने उत्तर दिले.

‘‘का नाही पडू शकत? कारण सांगू शकशील?’’

‘‘मध्ये रात्र असते म्हणून’’ भाच्याने लगेच सांगितले.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## खालील चित्रे पाहून म्हणी ओळखा व पुढील चौकटीत लिहा.



उत्तर



उत्तर



उत्तर



उत्तर



उत्तर



उत्तर

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

## खालील चित्रे पाहून म्हणी ओळखा व पुढील चौकटीत लिहा.



उत्तर



उत्तर




उत्तर



उत्तर



उत्तर



उत्तर

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

# 7 आमचंही, जरासं ऐका!

- संकलित

Q4P3T2



**(मूल्य - पर्यावरण जागृती)**

(एक माणूस वनामध्ये गाई चरायला घेऊन गेला होता. गाय चरत असताना एक चिमणी उडत उडत तिच्याजवळ येते.)

चिमणी :- चिव चिव चिव गं! तिकडे तू कोण गं ?

गाय :- अगं मी कपिला मावशी, का गं ! चिऊ, उदास का दिसशी ?

चिऊ :- काय सांगू गाई गाई,
छाती धडधडते पहा बाई !
काय करू सुचतच नाही!
भीती फार वाटते बाई ।।

गाय :- अगं अगं चिऊताई ।
मोबाईलचा आवाज,
तुज सहन न होई ।।
तू आहेस नाजूकशी ।
आवाजाने होशी कासाविशी ।।

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

(गाय ही आपले डोळे पुसते)

चिऊ :- कपिला मावशी काय गं झाले ?
तुझेसुद्धा डोळे का पाणावले ?

गाय :- काय सांगू चिऊताई !
प्लॅस्टिकचा बघ ढीग किती ?
घासाबरोबर प्लॅस्टिक जाते
माझे तर पोटशूळच उठते !!

चिऊ :- काय करावे, सुचत नाही
मानव शहाणा होतचं नाही.

गाय :- चल गं जाऊ तलावावर
पाणी पिऊ घोटभर!
(दोघी तलावाच्या काठावर जातात)

मासा :- अगं कपिला, अगं चिऊ !
नको इथले, पाणी पिऊ ।।

चिऊ :- का गं, का गं मासोळी ?
तू तर राहतेस याच जळी ।।

मासा :- अगं इथले जल विषारी ।
तगमग जीवाची होते भारी ।।
पाणी आहे घाण घाण ।
तडफडती जलचरांचे प्राण ।।

गाय :- ते बघ आले नागोबा.

चिऊ :- (नागोबास उद्देशून बोलते.)
अहो, अहो नागोबा
आज का झाले रागोबा ?

नागोबा :- नाही वारूळ, नाही शेती
मला पकडून, लाहया, दूध देती!
नको नको ती अंधश्रद्धा ।
मानवा, डोळे जरा उघड आता!

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

गाय :- (माणसाला उद्देशून बोलते )
का मुक्या प्राण्यांना देता त्रास ?
का जंगलांचा करता ऱ्हास ?
वाघोबा मग घालतात झडप
तुम्हांलाच करतात पोटात गडप

सर्व प्राणी :- मानवा! मानवा! ऐक तर खरे
वनचरे आता नच तुझे सोयरे
करत राहशील जर प्रदूषित सारे
धरती माता देईल दूषणे
तडफडशील मग दुधाविना
तडफडशील मग अन्नाविना
तेव्हाच होईल आमचे स्मरण
जागृत होऊन राखशील पर्यावरण!
(माणूस खाली मान घालतो.)

माणूस :- नका, नका हो असे बोलू,
आम्ही आमचे वर्तन बदलू
पर्वत, जल, वातावरण
नाही करणार प्रदूषण ।।
सदा करीन वृक्षारोपण
हिरवेगार वनीकरण ।।
कीटक, पक्षी अन् जलचर
सगेसोयरे तुम्ही वनचर ।।

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

## नवीन शब्दार्थ :

पोटशूळ - पोटदुखीची व्यथा, मासोळी - मासे, वारूळ - मुंग्यांचे घर,
ऱ्हास - नाश, वनचरे - वनातील प्राणी, दूषणे - दोष देणे,
सगेसोयरे - नातेवाईक, आप्त

## अभ्यास

**प्र.1. तक्रार व वनचर यांच्या माध्यमातून जोड्या पूर्ण करा.**

| तक्रार | वनचर |
|---|---|
| 1. मोबाईल आवाजाची भीती | चिमणी |
| 2. प्लॅस्टिक सेवनाने पोटदुखी | |
| 3. | मासोळी |
| 4. वारूळ, शेत नष्ट. | |

**प्र.2. खालील प्रश्नांची दोन-तीन वाक्यात उत्तरे लिहा.**

1) या पाठात कोणाकोणात संवाद झालेला आहे ?
2) चिमणीला कोणता त्रास होतो ?
3) गाईचे डोळे का पाणावले ?
4) मासोळीने आपली कोणती समस्या मांडली आहे ?
5) नागोबाची तक्रार कोणती आहे ?

**प्र.3. खालील शब्द वापरून वाक्ये तयार करा.**
**(घोटभर, मैलभर, तासभर, कणभर, चमचाभर)**

उदा : 1. दमून आलेला सुरेश घोटभर पाणी प्याला.

**प्र.4. हे कोण ते सांगा (वनचर, भूचर, जलचर, उभयचर).**

1. पाण्यात राहणारे : ____________
2. जमिनीवर राहणारे : ____________
3. जंगलात राहणारे : ____________
4. जमीन व पाणी या दोन्ही ठिकाणी राहणार : ____________

**प्र.5. खालील शब्दांचे समानार्थी शब्द पाठातून शोधून लिहा.**

| | | | |
|---|---|---|---|
| 1. किनारा | | 2. कपिला | |
| 3. जल | | 4. आठवण | |
| 5. मासा | | 6. नातेवाईक | |

**प्र.6. या पाठात कोणाकोणात संवाद झालेला आहे? त्यांची नावे लिहा.**

**उपक्रम:**

1. 'पर्यावरण प्रदूषण-एक समस्या' याविषयी 10 ओळीत निबंध लिहा.
2. पर्यावरण शुध्दतेसाठी होणाऱ्या उपक्रमामध्ये सहभागी व्हा.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

# 8

# भेट

- लक्ष्मण लोंढे

J5L1B6

**परिचय :**

(1945-2015) हे मराठी मधील विज्ञानकथा लेखक होते. त्यांचा 'दुसरा आईनस्टाईन' हा कथासंग्रह 'लक्ष्मणवेध', 'लक्ष्मणायन' 'गुंजा', 'काऊंट डाऊन' इत्यादी पुस्तके प्रसिद्ध. 'दुसरा आईनस्टाईन' या कथासंग्रहास महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट साहित्य निर्मितीचा पुरस्कार.

चंद्र हा पृथ्वीचा उपग्रह, त्यावर जाणे हे प्रत्येकाचे स्वप्न असते. सायली शाळेच्या ट्रीपबरोबर चंद्रावर जाते आणि तेथे काय गमतीजमती करते, ते पाहूया विज्ञानकथेमध्ये. हा पाठ 5 में 1994 च्या 'किशोर' अंकातून घेतला आहे.

## (मूल्य - कुतूहल)

अवकाशयानाच्या खिडकीच्या काचेला नाकाचा शेंडा चिकटवून सायली कितीतरी वेळ ते दृश्य टक लावून पहात होती तरी तिचे समाधान होत नव्हते. यापूर्वी अनेकवेळा तिने या दृश्याचे वर्णन वाचले होते, व्हिडिओवर तिने ते दृश्य पाहिलेसुद्धा होते. पण वर्णन वाचणं निराळं, अप्रत्यक्षपणे कॅमेऱ्याने टिपलेलं दृश्य पाहणं निराळं आणि प्रत्यक्षात ती गोष्ट पाहायला मिळणं निराळं, कितीही पाहिलं तरी समाधानच होत नव्हतं.

आकाशात हळूहळू चंद्राचा आकार मोठा मोठा होत होता आणि त्याचवेळी पृथ्वीचा लहान लहान होत जात होता. पृथ्वीवरून निळंभोर दिसणारं आकाश आता काळंकुट्टं दिसत होतं. आकाशातले ढग नाहिसे झाल्यामुळे चांदण्या तेजस्वी दिसत होत्या.

चंद्रावरची ट्रीप तशी खूपच महागात पडणारी होती. तरी आईनं सायलीला ट्रीपला धाडलं होतं.

''अग, आमच्या लहानपणी कुठे एवढया लांब लांब ट्रिपा निघत होत्या? आमच्या लहानपणी खूप लांबची म्हणजे युरोपची ट्रीप निघायची. तुला मिळते संधी तर जा'' आई म्हणाली होती.

''आणि अग, नेहाची आजी सांगत होती. त्यांच्या लहानपणी तर ना, शाळेतल्या मुलांची सर्वात दूरची सहल दिल्ली-कलकत्याला निघायची. ऐकायला किती गंमत वाटते नाही?'' सायली खुदकन हसत म्हणाली होती. तो किस्सा आठवून सायलीला आताही हसू आले.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

आता यान चंद्राच्या खूपच जवळ येत चाललं होतं. यानानं चंद्राभोवती प्रदक्षिणा घालायला सुरुवात केली होती. दर बत्तीस मिनिटांनी यानाची चंद्राभोवती एक प्रदक्षिणा होत होती. उजेड आणि अंधाराचा एक सुरेख पाठशिवणीचा खेळ तेथे दर बत्तीस मिनिटांनी एकदा घडत होता. एस्किमोंच्या इग्लू सारख्या आकाराच्या चंद्रावरच्या मानवी वस्त्यांचे घुमटही आता दिसू लागले होते.

काही वेळाने सायलीचे यान अलगदपणे चंद्रावर उतरले. यानाचा दरवाजा उघडला गेला आणि एका हवाबंद भुयारी मार्गाने मुलांना नील आर्मस्ट्राँग तळावरील वस्तीवर आणण्यात आलं.

सुरुवातीलाच तळावरील स्वागतिकेनं सूचना दिल्या.

चंद्रावरच्या नील आर्मस्ट्राँग तळावर तुम्हा सर्वांच मी हार्दिक स्वागत करते. चंद्रावरचा तुमचा प्रवास सुखाचा व्हावा म्हणून मला तुम्हाला काही प्रेमाच्या सूचना द्यायच्या आहेत. त्या कृपा करून पाळा. चंद्रावरचं गुरुत्वाकर्षण पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणाच्या केवळ एक षष्ठांश आहे. हे तुम्हा सर्वांना माहीतच आहे. अर्थात येथे ज्या घुमटाकार मनुष्यवस्त्या आहेत. तेथे कृत्रिमपणे पृथ्वीएवढेच गुरुत्वाकर्षण आले आहे, या वस्त्यांच्या बाहेर मात्र मूळचे चंद्राचे गुरुत्वाकर्षण आहे. तेथे वावरताना. तुम्हाला खूपच सावधगिरी बाळगावी लागेल. दुसरी महत्त्वाची गोष्ट चंद्रावरच्या खरेदीसंबंधी, तुमच्यापैकी बऱ्याच जणांना चंद्रावरून एखादी भेटवस्तू घरी घेऊन जायची इच्छा असेल तर कृपा करून तुमची सगळी खरेदी घुमटाकार वस्त्यांमधील दुकानांमधूनच करा. तेथे तुम्हाला खात्रीशीर माल मिळेल. वस्तीबाहेरच्या अनधिकृत दुकानांतून काहीही खरेदी करू नका, तुमचे सहलीचे दिवस आनंदात जावोत अशी मी शुभेच्छा व्यक्त करते.

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

ट्रीपचा तीन दिवसांचा भरगच्च कार्यक्रम आखण्यात आला होता.

वास्तविक चंद्रावर पृथ्वीच्या हिशेबाने पंधरा दिवसांचा दिवस आणि पंधरा दिवसांची रात्र होती. ट्रीपचे तीन दिवस रात्रीच्या पंधरा दिवसातले होते. पहिल्याच दिवशीचा एक महत्त्वाचा कार्यक्रम आकाशदर्शन हा होता. पृथ्वीवर नेहमीच ढगाळ वातावरण असे. त्यामुळे आकाशातील तारे जरी दिसले तरी स्पष्ट दिसत नसत. चंद्रावर वातावरणच नसल्यामुळे तिथल्या काळ्याभोर आकाशाच्या पार्श्वभूमीवर तारका फारच उठावदार दिसत होत्या.

पण आकाशातील सर्वात विलोभनीय दृश्य म्हणजे पृथ्वीची तबकडी! चंद्राच्या आकाशातली पृथ्वी चंद्राच्या जवळजवळ तेरा पट मोठी दिसत होती. सत्तरपट अधिक प्रकाशमान दिसत होती.



चंद्रावर पृथ्वीप्रकाश पडला होता  ते विलोभनीय दृश्य पाहून पहिल्या दिवशी सायली आणि तिची मित्रमंडळी आनंदात झोपी गेली.

दुसऱ्या दिवसाचं खास आकर्षण होतं चंद्रावरची सर्कस! ह्या सर्कशीची पण एक मजाच होती! प्रेक्षकांनी तंबूत बसायचं आणि सर्कस बाहेर उघडयावर चालायची. लांबउडी, उंचउडी हे प्रकार खरोखरच पहाण्यासारखे झाले. एका व्यायामपटूने चक्क बहात्तर फूट उंच उडी मारली! बहात्तर फूट म्हणजे जवळजवळ सात मजले उंच!

दोन्ही दिवशी मुख्य आकर्षणांशिवाय खूपवेळ चंद्रावरच्या विविध वस्त्यांवर फिरण्यासाठी ठेवलेला होता. या वेळात आपण कोठेकोठे फिरलो, कायकाय पहिले यावर बाईंनी मुलांना निबंध लिहायला सांगितलं होतं. सायली आणि तिच्या मैत्रिणींनी या दोन दिवसात खूप भटकंती केली.

तिसऱ्या दिवशी बाईंनी मुलांना एका ऐतिहासिक महत्त्वाच्या स्थळाला भेट देण्यासाठी नेलं होतं. शंभर वर्षांपूर्वी नील आर्मस्ट्राँग ज्या ठिकाणी उतरले; त्या ठिकाणाला भेट द्यायला! ट्रीपमधल्या या कार्यक्रमाचं सगळ्यांना खूपच आकर्षण वाटत होतं. ते दोन कारणांनी एक, ते चंद्राच्या इतिहासातलं सर्वात जुनं स्थळ होतं. त्या ठिकाणी उमटलेला आर्मस्ट्राँगच्या पावलांचा ठसा अद्याप तसाच ठेवण्यात आला होता. त्या ठशाच्या शेजारी त्यांचा भव्य पुतळा होता आणि त्या पुतळ्याखाली चंद्रावर उच्चारले गेलेले मानवाचे पहिले उद्‌गार कोरलेले होते. ...............
''एका माणसाच्या दृष्टीनं एक पाऊल पण मानवतेची ही हनुमान उडी आहे!''

या कार्यक्रमाचं दुसरं आकर्षण म्हणजे मुलांना आता प्रथमच स्पेस सूट घालायला मिळणार होते. या एका कार्यक्रमापुरती मुलं उघडयावर चंद्राच्या गुरुत्वाकर्षणा खाली वावरणार होती.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

''सांभाळून चाला रे मुलांनो! धावू नका, पळू नका, पडाल'' बाई परत परत मुलांना सांगत होत्या. पण मुलं ऐकण्याच्या मूडमध्ये होतीच कुठे ? ती केव्हाच पळाली होती.

''चंद्रावरच्या खास दगडांपासून बनविलेले दागिने घ्या. वस्तीवरच्या पेक्षा स्वस्त ............... पण आहेत कसे मस्त मस्त ............... एकदा पाहून तर घ्या ............... रस्त्यावरचे विकेते तारस्वरात ओरडत होते. ''घ्या ताई घ्या ............... एकदम स्वस्त लावलेत बघा हे इयररिंग्ज'' म्हणत एक विक्रेता सायलीपाशी आला आणि त्याने चमकदार खडयांच्या रिंगांचे घडच्या घड सायलीपुढे धरले. सायलीला एकदम आईची आठवण झाली. उद्या तर परतीच्या प्रवासाला निघायचं होतं. गेल्या तीन दिवसात ती आईला पार विसरून गेली होती. सायलीला खूपच अपराध्यासारखं वाटू लागलं.

''घ्या ताई आता विचार करूच नका ............... एकदम स्वस्त आणि एकदम मस्त ............... घ्या.''

सायलीनं आजूबाजला पाहिलं. इतर मुलं कोठच्या कोठे निघून गेली होती.

''चल पटकन ते लाल इअरिंग्ज दे'' सायलीने बोट दाखवीत म्हटलं आणि विचारलं ............... ''किती पैसे?''

''फक्त शंभर रूपये'' विक्रेत्याने म्हटले.

सायलीने पटकन् पैसे दिले, इयररिंग्ज घेतले आणि धूम ठोकली.

''एवढया धावू नका ताई-पडाल'' विकेत्याचे शब्द सायलीला ऐकू आले आणि तेवढयात ती खाली पडलीच! सायलीने पाहिलं ती कॉटवरुन खाली पडली होती आणि तिची आई तिला उठवत होती. म्हणजे हे सर्व स्वप्न होतं तर!

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

## नवीन शब्दार्थ :

| | | |
|---|---|---|
| अवकाशयान | - | अवकाशात जाणारे वाहन |
| तेजस्वी | - | तेज:पुंज, प्रकाशमान |
| ट्रीप | - | सहल |
| घुमट | - | देवळाचा, मशिदीचा गोलाकार मोठा कळस |

| | | |
|---|---|---|
| निराळं | - | वेगळं |
| हवाबंद | - | निर्वातपोकळी, हवा नसलेली जागा |
| भुयारीमार्ग | - | जमिनीखालून खोदलेला रस्ता |
| किस्सा | - | गंमतीदार प्रसंग |
| कृत्रिम | - | मानवनिर्मित |
| भरगच्चं | - | भरपूर, पुष्कळ |
| उठावदार | - | उठून दिसणारे |
| पार्श्वभूमी | - | पाठीमागची बाजू |
| अलगद | - | हळुवारपणे |
| वस्ती | - | राहण्याची जागा |
| वावरताना | - | फिरताना |
| भटकंती | - | भरपूर फिरणे |
| उद्गार | - | तोंडातून अचानक आलेले शब्द |
| एक षष्ठांश | - | एकाचा सहावा भाग |
| तळ | - | थांबण्याची मोकळी जागा |
| टक लावून पाहणे | - | एकसारखे पाहणे |
| तारस्वरात ओरडणे | - | मोठ्याने ओरडणे |
| धूम ठोकणे | - | पळून जाणे |
| प्रदक्षिणा घालणे | - | भोवताली फेरी घालणे |
| सावधगिरी बाळगणे | - | काळजी घेणे |
| खुद्कन हसणे | - | गालातल्या गालात हसणे |
| हनुमान उडी मारणे | - | मोठी झेप घेणे |
| धाडणे | - | पाठविणे |

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

## टिपा :

| | | |
|---|---|---|
| एस्किमो | - | टुंड्रा प्रदेशात राहणारी एक जमात |
| इग्लू | - | स्किमोंची बर्फापासून बनवलेली घरे |
| नील आर्मस्ट्राँग | - | चंद्रावर पाऊल ठेवणारा व अमेरिकेने अंतराळात पाठवलेला पहिला मानव |
| स्पेस सूट | - | अंतराळात जाताना घालावयाचा विशिष्ट प्रकारचा पोषाख |

## अभ्यास

**प्र.1. खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

1. यानाची चंद्राभोवती एक प्रदक्षिणा पूर्ण होण्यास किती वेळ लागत होता?
2. चंद्रावरचे गुरुत्वाकर्षण आणि पृथ्वीवरील गुरुत्वाकर्षण यात कोणता फरक आहे?
3. स्वागतिकेने भेटवस्तू कोठे खरेदी करण्यास सांगितले?
4. नील आर्मस्ट्राँगच्या पुतळ्याखाली कोणते उद्‌गार कोरले होते?
5. व्यायामपटूने किती उंच उडी मारली?

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

**प्र.2. खालील चौकटीत विरुद्धार्थी शब्द दिले आहेत, गोलातील विरुद्धार्थी शब्द निवडून उत्तराच्या जागी लिहा.**

समाधान, प्रत्यक्ष, मोठा, तेजस्वी, खरेदी, दिवस, स्वप्न, उजेड

महाग, लहान, अंधार निस्तेज, विक्री, असमाधान, अप्रत्यक्ष, रात्र

| | उत्तरे | | उत्तरे |
|---|---|---|---|
| 1. समाधान × | ________ | 5. खरेदी × | ________ |
| 2. प्रत्यक्ष × | ________ | 6. दिवस × | ________ |
| 3. मोठा × | ________ | 7. स्वस्त × | ________ |
| 4. तेजस्वी × | ________ | 8. उजेड × | ________ |

**प्र.3. खालील शब्दांचे वचन बदला.**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1. | खिडकी | - ________ | 4. | तारे | - ________ |
| 2. | चांदणी | - ________ | 5. | पावले | - ________ |
| 3. | दुकान | - ________ | 6. | पुतळे | - ________ |

**प्र.4. खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1. | ढग | - ________ | 3. | रात्र | - ________ |
| 2. | आकाश | - ________ | 4. | चंद्र | - ________ |

**प्र.5. लहान चौकोनात जोडशब्दातला पहिला शब्द व मोठ्या चौकोनात जोडशब्दातला दुसराशब्द दिला आहे. त्यापासून योग्य जोडशब्द तयार करा व दिलेल्या जागेत लिहा.**

भोर शुभ्र धमक

निळं काळं, पिवळं
लाल पांढरे, हिरवा

कुट्ट भडक गार

1. ________
2. ________
3. ________
4. ________
5. ________
6. ________

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

**उपक्रम:**

1. आंतरजालावरून नील आर्मस्ट्राँग बद्दल अधिक माहिती मिळवा व लिहून काढा.
2. जयंत नारळीकरांच्या विज्ञानकथा मिळवून व वाचा.

**उपक्रमः**

1. पुढील अंक/ चित्र व अक्षरे जोडून वाचा व पहा कोणते गाव मिळते.




2. पुढील विखुरलेल्या अक्षरांमध्ये तुमच्या वाढदिवसाला आलेल्या मित्रांची नावे आहेत, ती शोधून लिहा.



उदा. 1) दिनकर

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

# 9 चिंगीचा पराक्रम

**- ना.धो. ताम्हणकर**

**परिचय :**

नारायण धोंडोपंत ताम्हणकर (जन्म 1893 - 1961) मराठीतील कथा लेखक होते. त्यांच्या कथेत मानवी जीवनातील विविध प्रसंगाचे चित्रण त्यानी केले आहे. त्यानी मुलांसाठी गोटया, चिंगी, निलांगी, नारो महादेव, रत्नाकर, आणि खडकावरल, अंकुर ही पुस्तके लिहिली आहेत. त्यांच्या 'गोट्या' या दूरदर्शनवरील मालिकेला खूपच प्रसिध्दी मिळाली.

प्रस्तुत पाठात बालमनाची निरागसता आणि चिंगीने आपल्या आईला नागपंचमीच्या दिवशी नागोबाचे दर्शन निर्भयपणे कसे घडविले. याचे वर्णन केले आहे. हा पाठ बाबा भांड यांनी संपादित केलेल्या 'श्रेष्ठ भारतीय बालकथा' या पुस्तकातून घेतलेला आहे.

**(मूल्य - विनोदनिर्मिती)**

गोडशांच्या सुधाची मंगळागौर होती. गोडसीणबाईची डॉक्टरीणाबाईशी चांगली गट्टी असल्यामुळे त्या सकाळपासून गोडशांच्या घरी गेल्या होत्या. आईबरोबर चिंगीला आमंत्रण असायचेच.

डॉक्टरीणबाई स्वयंपाकघरात मैत्रिणीला मदत करीत होत्या. चिंगी सुशीबरोबर फुलें, पत्री जमविण्याच्या गडबडीत होती.

मंगळागौरीच्या जोडीला आज नागपंचमी आली होती. रात्री खूप पाऊस पडला होता. सकाळपासून नुसती बुरबुर चालू होती.

अंगणात पाणी साठलें होते. गोडशांचा सोन्या आणि मोत्या कागदाच्या नावा साचलेल्या पाण्यावर सोडण्यांत गर्क झाले होते. चिंगी आणि सुशी त्यांना जाऊन मिळाल्या.

नावांच्या खेळाने कंटाळल्यावर अंगणातली तळी रिकामी करण्याचा उद्योग मुलांनी सुरू केला. पसे भरभरून पाणी अंगणभर फेकले जाऊ लागले. थोड़े थोडेच पाणी होते ते पायांनी सारवले गेले. साहजिकच तेथे निसरडे झाले. त्याचा प्रसाद पूजेला आलेल्या वनितेला मिळाला!

ती श्रीमंताची मुलगी जरीचा शालू नेसून आणि सोन्यामोत्याचे खूप दागिने घालून आली होती. पूजेच्या साहित्याचे चांदीचे तबक एका हातात आणि दुसऱ्या हातात फुलांची परडी, असा तिचा थाट होता.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

पण अंगणांतील निसरड्यावर पाय निसरून वनितातार्इने राडींत लोटांगण घातले! शालू खराब झाला आणि दागिन्यांवरही चिखलाचे शिंतोडे उडाले.पूजेचे तबक आणि फुलांची परडीही अंगणभर पसरली. दहा मंडळींच्यादेखत आपली अशी शोभा झाल्यावर कोणत्या मुलीला रडू आल्याशिवाय राहील ? अशा वेळी मनात मौज वाटत असली तरी मोठी माणस हसू आवरून पोक्तपणाचा आव आणतात. पण लहान मुलांना तसलं नाटक जमत नाही. कोणी पडलेले दिसले, की ती टाळ्या वाजवून खिदळायला लागतात.

आताही असेच झाले. वनितेची ती दुर्दशा बघताच, ''पाऊस पडला, भोपळा फुटला'' असे घोकीत सुशी, सोन्या आणि मंडळी टाळ्या पिटू लागली.

''गप्प बसा, चालती व्हा इथून! फाजील पोरटी,'' अशा वडील मंडळींच्या गर्जना ऐकून स्वयंपाकघर, माजघरांतल्या बायका काय प्रकार आहे तो पाहायला बाहेर धावून आल्या.

खराब पाण्यात नाचताना चिंगीच्या नव्या परकरपोलक्यावर नव्हे तर गालाकपाळावरही खडी निघाली होती, त्याबद्दल तर डॉक्टरीणबार्इना राग आलाच, पण वनितातार्इला लोटांगण घालायला लावण्यास चिंगीचीच करामत कारणीभूत झाली असली पाहिजे असा त्यांना वहीम झाला, एखाद्याचे कानफाट्या नाव पडले, की प्रत्येक वेळी त्याच्यावरच आळ घ्यायची लोकांची रीतच असते.

डॉक्टरीणबार्इंनी चिंगीच्या दंडाला धरून फरफरा ओढीत आणले आणि ''ही कार्टी कुठे गेली नि सुधेपणाने राहिली असं व्हायचंच नाही'' असे कावत कदरत तिच्या पाठीत धपाटे घातले. जेवायची वेळ झाल्याशिवाय इकडे फिरकायचे नाही अशी ताकीद देऊन त्यांनी तिची घरी हकालपट्टी केली.

चिंगी रंजीस होऊन घरी गेली. पण तेथे तिला मौजेचा विषय मिळालाच. एक गारुड्याचा छोकरा करंडी घेऊन 'नागोबाला दूध द्या. पंचमीची ओवाळणी द्या' म्हणत आला.

नागोबा देव आहे आणि नागपंचमीच्या दिवशी नागोबाचे दर्शन घेतले म्हणजे पुण्य लागते असे चिंगीने ऐकले होते. तिने गारुड्याला नागोबा दाखवायला सांगितले. नागोबाला तिने नमस्कार केला आणि फडताळातून दूध आणून गारुड्याच्या वाटीत घातले. त्याने दक्षिणा मागितल्यावर पेन्सिलीसाठी मागून घेतलेला पैसाही त्याला देऊन टाकला.

''ए नागोबावाल्या, पलीकडल्या घरी आई आहे. तिला नागोबाचं दर्शन घ्यायचंय, तिकडे चल. ती दूध देईल नि दक्षिणाही देईल. येतोस?''

@KTBS NOT TO BE REPUBLISHED



चिंगीची ही मागणी गारुडी कशाला नाकारील? तो चिंगीबरोबर गोडशांच्या घरी गेला.

चिंगी आत जाऊन म्हणाली, ''आई ग, जंमत आणलीय तुला दाखवायला. अंगणांत चल.''

''मी नाही येत तुझी जंमत बघायला काम टाकून. तूच घेऊन बैस जा तुझी जंमत.''

आईने असे धुडकावले तरी नागपंचमीच्या दिवशी तिचे नागदर्शन अंतरणे चिंगीला प्रशस्त वाटेना. ती बाहेर आली. गारुड्याचा पोर करंडी पुढ्यात ठेवून पान खाण्याची तयारी करीत होता.

''हे बग किनई , आमची आई कामात आहे. ती बाहेर नाही येत. म्हणून मीच तिला नागोबा दाखवून आणते हं'' असे म्हणून चिंगीने त्याची टोपली उचलली सुद्धा.

''हां हां! नगा हात लांवू. नाग भैर पडल.'' असे गारुडी ओरडू लागला. पण तिकडे लक्ष न देतां चिंगीने आत धूम ठोकली.

माजघरात चांदीच्या चौरंगाभोवती आठ दहा मुली मंगळागौर पूजीत होत्या. भटजी पूजा सांगत होते. चिंगीचे ते खटले दिसतांच भटजी मंत्र थांबवून किंचाळले, ''अरे बापरे! काय करावं ह्या पोरटीला!''

भटजीबरोबर मुलीही दचकून उठल्या व मग चिंगीही भेदरली, टोपली खाली पडली. नागोबा वळवळत बाहेर आले. मंगळागौर चौरंगावरच राहिली. पोथी पाटावरच्या पाटावर बसली. मुली

किंचाळत सैरावैरा धावू लागल्या. भटजींची बोबडी वळली. तो गलका ऐकून सोप्यावरले पुरुष आणि स्वयंपाकघरातल्या बायका धावून आल्या. पण फणा काढलेल्या नागोबाला पाहाताच त्यांचे पाय जागच्या जागी खिळले. सर्वांचे चेहेरे भीतीने पांढरे फटफटीत झाले.

चिंगी मात्र नागोबावर टोपलींचे झाकण घालण्याचा प्रयत्न निर्भयपणे करीत होती.

इतक्यात गारुडी आत घुसला आणि त्याने आपले जनावर आपल्या कब्जांत घेतले.

''आई, झालं ना तुला नागोबाचं दर्शन ? नागपंचमी आहे आज!'' चिंगीने विचारले.

ह्या असल्या पोरटीवर रागवावे की तिला हसावे हेच कोणाला कळेना!

## नवीन शब्दार्थ :

| | | |
|---|---|---|
| गट्टी | - | मैत्री |
| गर्क झाले | - | तल्लीन झाले |
| तबक | - | ताट, पात्र |
| परडी | - | टोपली |
| पोक्तपणा | - | समजूतदारपणा |
| खिदळणे | - | हसणे |
| दुर्दशा | - | वाईट अवस्था |
| घोकीत | - | तोंडाने म्हणत |
| टाळ्या पिटणे | - | टाळ्या वाजविणे |
| वहीम | - | अंदाज, संशय |
| कावत | - | रागाने ओरडत |
| ताकीद देणे | - | इशारा देणे |
| छोकरा | - | मुलगा |
| सैरावैरा धावणे | - | इकडे तिकडे धावणे, |
| बोबडी वळणे | - | खूप घाबरणे |
| निर्भय | - | न घाबरणारा |
| रंजीस येणे | - | रडू येणे |

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## अभ्यास

**प्र.1. खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

1. मंगळागौरीच्या जोडीला आज काय आली होती?
2. वनितातार्इंने कोठे लोटांगण घातले?
3. काय घोकीत सुशी सोन्या आणि मंडळी टाळ्या पिटू लागली?
4. आत जाऊन चिंगी आईला काय म्हणाली?
5. भटजींची बोबडी का वळली?

**प्र.2. खालील प्रश्नांची दोन-तीन वाक्यात उत्तरे लिहा.**

1. पाय निसरून अंगणात पडल्यावर वनितातार्इंची अवस्था कशी झाली?
2. गारुड्याचा छोकरा करंडी घेऊन काय म्हणत होता?

**प्र.3. खालील प्रश्नाचे पाच-सहा वाक्यात उत्तर लिहा.**

1. चिंगीने आईला नागोबाचे दर्शन कसे घडविले ?

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**प्र.4. खाली दिलेल्या शब्दातून निवडून समानार्थी शब्द चौकटीत भरा.**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1. आरंभ | - | | 4. घर | - | |
| 2. पवन | - | | 5. अंधार | - | |
| 3. कनक | - | | 6. आरसा | - | |

(सदन, वारा, सोने, सुरवात, काळोख, दर्पण)

**प्र.5. खाली दिलेल्या शब्दातून विरुद्धार्थी शब्द निवडून लिहा.**

अशक्य, डोळस, सोपे, निराशा, रोख, उत्साह

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1. अवघड | × | ____________ | 4. उधार | × | ____________ |
| 2. शक्य | × | ____________ | 5. आळस | × | ____________ |
| 3. आशा | × | ____________ | 6. आंधळा | × | ____________ |

**उपक्रम:**

1. चिं. वि. जोशी यांच्या विनोदी कथा मिळवून वाचा.
2. तुमच्या शाळेच्या स्नेहसंमेलनात विनोदी नाटक सादर करा.

## जरा हसूया

### सामान्य ज्ञान






चित्र निरखून पहा व चित्रातील विनोदाचा आनंद घ्या.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

14

# प्राजक्ताची फुले

- मंगेश पाडगावकर

C9M2E4

**परिचय :**

मंगेश केशव पाडगावकर (1929-2015) मराठी भाषेतील प्रसिद्ध कवी. 'धारानृत्य', जिप्सी, 'छोरी', 'मीरा', 'सलाम' हे त्यांचे कवितासंग्रह प्रसिद्ध, 'सलाम' या काव्यसंग्रहाला साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला आहे.

मोकळ्या कुरणावरती असणाऱ्या प्राजक्ताच्या झाडाची पडणारी फुले व त्यांचे सौंदर्य अनुभवणाऱ्या मुलांच्या मनातील आनंद प्रस्तुत कवितेत कविने व्यक्त केला आहे.

**(मूल्य - निसर्गप्रेम)**

**टप्टप् पडती अंगावरती प्राजक्ताची फुले**
**भिर् भिर् भिर् भिर् त्या तालावर गाणे आमुचे जुळे!**
**कुरणावरती, झाडाखाली ऊनसावली विणते जाळी**
**येतो वारा पाहा भरारा, गवत खुशीने झुले!**
**दूरदूर हे सूर वाहती, उन्हात पिवळ्या पहा नाहती**
**हसते धरती, फांदीवरती हा झोपाळा झुले**
**गाणे आमुचे झुळझुळवारा, गाणे आमुचे लुकलुक तारा**
**पाऊस, वारा, मोरपिसारा या गाण्यातुन फुले!**
**फुलांसारखे सर्व फुलारे, सुरात मिसळुनि सूर, चलारे**
**गाणे गाती तेच शहाणे, बाकी सारे खुळे!**



©KTBS NOT TO BE REPUBLISHED

## कवितेचा सरळ अर्थ

पारिजातकाची शुभ्र फुले आमच्या अंगावर टपटप पडत आहेत. त्या भिरभिरत्या तालावर आम्ही एकत्र गाणे गात आहोत.

खुल्या हिरवळीवर, झाडांखाली, ऊनसावलीने सुंदर जाळे विणले आहे. त्यातच भरभर वारा येताच गवत आनंदाने डोलते आहे.

आमच्या गाण्याचे सूर लांबवर वाहत जातात. पिवळ्याधम्म उन्हात न्हातात सगळी धरणी मधुर हास्य करते आहे. फांदीवरती झोका झुलतो आहे.

झुळझुळ वाऱ्यासारखे आणि लुकलुकणाऱ्या ताऱ्यासारखे आमचे गाणे आहे. गाण्यातून पावसाच्या धारा बरसतात. वाऱ्याची लकेर उमटते आणि सुंदर मोरपिसारा फुलतो.

कवि म्हणतात - मुलांनो, तुम्ही फुलांसारखे फुलून या, सुरात सूर मिसळून एकत्र चला. जे गाणे गातात तीच शहाणी मुले असतात आणि जी मुले गात नाहीत ती वेडीखुळी असतात. (म्हणून सतत गात रहा)

### नवीन शब्दार्थ :

| | | |
|---|---|---|
| कुरण | - | गवत, चराऊ जमीन |
| खुळे | - | वेडे |
| भरारा | - | भरभर |
| ताल | - | ठेका |
| झोपाळा | - | झुला |
| नाहती | - | भरुन जातात |
| प्राजक्त | - | पारिजातकाची |
| फुले नाहणे | - | अंघोळ करणे, स्नान करणे |

## अभ्यास

**प्र.1. खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा :**

1. मुलांच्या अंगावरती काय पडते?
2. गवत कसे डुलते?
3. मुलांच्या गाण्यातून काय फुलते?

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

4. या कवितेत खुळे कुणाला म्हटले आहे?

5. झाडांखाली जाळी कोण विणते?

## प्र.2. कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनांनुसार कृती करा.

**आकृत्या पूर्ण करा.**

1. ऊनसावली येथे जाळी विणते → 1. _ _ _ _ _ _ _ _ _ _ / 2. _ _ _ _ _ _ _ _ _ _

2. आवाज → प्राजक्ताच्या फुलांचा → _ _ _ _ _ _ _ _ _ _ ; वाऱ्याचा → _ _ _ _ _ _ _ _ _ _

3. चौकटी पूर्ण करा

गाणे → गाणारे → 1. _ _ _ _ _ _ _ _ _ _ ; न गाणारे → 2. _ _ _ _ _ _ _ _ _ _

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## प्र.3. पुढे दिलेल्या मोठया चौकोनातील शब्दांना लहान चौकोनात दिलेले विरुद्ध अर्थाचे शब्द शोधा व लिहा.

**उदा. बरे × वाईट**

| | | |
|---|---|---|
| अशुभ | अपयश | उतार |
| | बरे, चढ, नफा | |
| लहान | आत, सुख, यश | बाहेर |
| वाईट | मोठे, शुभ, | |
| | तोटा | दुःख |

**उत्तरे**

1. ________ × ________
2. ________ × ________
3. ________ × ________
4. ________ × ________
5. ________ × ________
6. ________ × ________
7. ________ × ________

**प्र.4. खालील चौकटीमधून फुलांची नावे शोधा व गोल करा.**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| पा | रि | जा | त | क | मो |
| जा | ई | जु | ई | रा | ग |
| गु | ल | छ | डी | ब | रा |
| ला | चा | फा | अ | शे | जा |
| ब | झें | डू | पा | वं | स्वं |
| स | दा | फु | ली | ती | द |

उदा .......... चाफा

**उपक्रमः**

1. निसर्गात घडणाऱ्या विविध बदलांचे निरीक्षण करुन नोंद करा.
2. पहाटेच्या वेळी फेरफटका मारुन त्या वेळेचे वर्णन तुमच्या शब्दात लिहा.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED



## चला थोडे हसूया

### उभा

कंडक्टर - तुम्ही कोठून बसला?

प्रवासी - शिवाजीनगरहून

कंडक्टर - तुम्हाला तर मी त्याच्या आधी बसमध्ये बसताना पाहिलय.

प्रवासी - ते खरं आहे परंतु शिवाजीनगरपर्यंत मी उभाच होतो.

15

# पुस्तके

F8S9K3

- सफदर हाश्मी

**परिचय :**

सफदर हाश्मी : (1954 - 1989) नाटककार, कथाकार, गीतकार, इंग्रजी साहित्याचे व्याख्याते. 'तीन करोड', 'औरत और महंगाई' ही नाटके. दूरदर्शनसाठी 'खिलती कलियाँ', या मालिकेचे लेखन. प्रस्तुत कवितेमध्ये पुस्तकाचे महत्व सांगितले आहे. ही कविता अनुवादित आहे.

(मूल्य - ज्ञान)

**पुस्तकं सांगतात गोष्टी युगायुगांच्या.**
**माणसांच्या जगाच्या,**
**वर्तमानाच्या - भूतकाळाच्या,**
**एकेका क्षणाच्या!**
**जिंकल्याच्या - हरल्याच्या**
**प्रेमाच्या - कटुतेच्या!**
**तुम्ही नाही का ऐकणार**
**गोष्टी पुस्तकांच्या?**
**पुस्तके काही करु इच्छितात,**
**तुमच्याजवळ राहू इच्छितात.**
**पुस्तकांत पाखरं चिवचिवतात.**
**पुस्तकांत आखरं सळसळतात**
**पुस्तकांत निर्झर गुणगुणतात.**
**पुस्तकं परिकथा ऐकवतात.**
**पुस्तकांत रॉकेट्चे तंत्र आहे,**
**पुस्तकांत विज्ञानाचा मंत्र आहे**
**पुस्तकांची दुनिया न्यारी आहे.**




NOT TO BE REPUBLISHED @KTBS

ज्ञानाची उत्तुंग भरारी आहे!
तुम्हांला नाही का जायचं
पुस्तकांच्या विश्वात?
पुस्तकं काही सांगू इच्छितात,
तुमच्या जवळ राहू इच्छितात.

## नवीन शब्दार्थ :

युगायुगांच्या - प्राचीन काळीपासूनच्या
कटुता - कडवटपणा
पाखरं - पक्षी
आखरं - अक्षर
निर्झर - झरा
न्यारी - वेगळी
उत्तुंग - खूप उंच,
परिकथा - काल्पनिक गोष्टी
रॉकेट - अग्निबाण,
विश्व - जग
वर्तमान - सध्याची स्थिती

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

## अभ्यास

**प्र.1. कवितेच्या ओळींचा आधार घेऊन चौकटी पूर्ण करा.**

1. पुस्तकं सांगतात गोष्टी [ ]
2. [ ] तुमच्याजवळ राहू इच्छितात
3. पुस्तकं [ ] ऐकवतात.

4. पुस्तकात [ ] मंत्र आहे.

5. [ ] उत्तुंग भरारी आहे.

**प्र.2. खालील प्रश्नांची दोन - तीन वाक्यात उत्तरे लिहा.**

1. पुस्तके तुमच्याजवळ का राहू इच्छितात?
2. आपण पुस्तकांच्या विश्वात जायला हवे, असे कविला का वाटते?

**प्र.3. 'पुस्तके' या कवितेतील खालील गोष्टी काय करतात ते लिहा.**

उदा - पाखरं - चिवचिवतात

(अ) आखरं (आ) निर्झर (इ) परिकथा

**उपक्रमः**

1. तुम्ही वाचलेल्या किमान पाच पुस्तकांसंबधी खालील मुद्यांच्या आधारे थोडक्यात माहिती लिहा

| पुस्तकाचे नाव | लेखक/कवी | विषय | आवडलेली वाक्ये | नवे शब्द |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

**विचार करा व तुमचे मत सांगा.**

1. छापलेले पुस्तक व ई - पुस्तक यापैकी तुम्हांला कोणते पुस्तक वाचायला आवडेल? का?

| छापलेले पुस्तक | ई - पुस्तक |
|---|---|
| | |

# कोडी

**चित्रांच्या आधारे कोडी पूर्ण करा.**

| | |
|---|---|
| वेलीवर फुलते<br>गजऱ्यात हसते<br>वेणीत माळते आई<br>मी तर नाजूक ...... |  |
| लाल चुटुक रंग<br>डौलदार माझं अंग<br>नेहमी दिसते आनंदी<br>मी तर तुमची ...... |  |
| पाण्यात राहतो<br>वाऱ्यावर डुलतो<br>अंगाला माझ्या लागत नाही मळ<br>सगळेजण मला म्हणतात ...... |  |
| पिवळा माझा रंग<br>नाजुक माझं अंग<br>सगळे माझा वास घेती<br>मी आहे छानदार ...... |  |

16

# बाप

K1Y5M2

- प्रा. प्रशांत बागूल

**परिचय :**

प्रा. प्रशांत बागूल - प्रशांत निंबाजीराव बागूल. एम. ए., बी.एड्. लेखन वाचनाची आवड, अनेक काव्यवाचन स्पर्धेत पुरस्कार प्राप्त केले आहेत. नाशिकच्या 94 व्या अ.भा.सा. संमेलनातील कविताकट्टा या कार्यक्रमामध्ये 'पर्यावरण ध्यास' या कवितेची निवड.

प्रस्तुत कवितेत बापाचे कष्ट, त्याग यांचे वर्णन केले आहे. ही कविता 'दैनिक देशदूत' यातून निवडली आहे.



(मूल्य - समता)

**माय मर्यादा घराची**
**बाप सामर्थ्य असतो**
**काळ संघर्षाचा येता**
**उर्जा लढण्याची देतो.**

**स्वतः ठिगळ लावूनी**
**बाप दारिद्र्य झाकतो**
**सुख मुलीला मिळण्या**
**ओझे कर्जाचे पेलतो.**

**कन्या सासरी जाताना**
**बाप अश्रूंना लपवी**
**काळजाच्या तुकड्याला**
**मूल्य त्यागाचे शिकवी.**

**पोटा चिमटा काढूनी**
**बाप पिलांना भरवी**
**आग पोटाची शमण्या**
**गातो कष्टाची भैरवी.**

**दुःख मनात ठेवुनी**
**बाप नेहमी झटतो**
**घर संसार फुलण्या**
**झळा उन्हाच्या सोसतो.**

**माय धरेचे रूपडे**
**कुशी अंकुर रुजवी**
**बाप असतो आभाळ**
**सारे जीवन फुलवी.**

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

## नवीन शब्दार्थ :

मर्यादा - सीमा

सामर्थ्य - बळ, ताकद

संघर्ष - संकट, कठीण काळ

उर्जा - ताकद, प्रेरणा

झळा - त्रास

धरा - पृथ्वी

त्याग - मोह सोडून देणे

रूपडे - रूप

अंकुर - बीज

## टिपा :

भैरवी - संगीत मैफिलीची भैरवीने सांगता होते. भैरवी म्हणजे संगितातील एक राग होय. पण या कवितेत कष्टाचे गाणे असे म्हटले आहे.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

## अभ्यास

**प्र.1. खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

1. घराची मर्यादा कोण असते ?
2. बाप अश्रू केव्हा लपवितो ?
3. बाप काळजाच्या तुकड्याला काय शिकवतो ?
4. उन्हाच्या झळा बाप का सोसतो ?

**प्र.2. खालील प्रश्नांची दोन - तीन वाक्यात उत्तरे लिहा.**

1. बाप कष्टाची भैरवी का गातो ?
2. बाप दारिद्र्य कसे झाकतो ? व कर्जाचे ओझे का पेलतो ?

## प्र.3. रिकाम्या जागा भरा.

1. पोटा ______ काढुनी बाप ______ भरवी
2. माय धरेचे ______ कुशी ______ रूजवी
3. गातो कष्टाची ______

## प्र.4. खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.

1. धरा ______
2. सामर्थ्य ______
3. कष्ट ______
4. माय ______

### उपक्रम:

1. 'आई' विषयावर असलेल्या कविता शिक्षकांच्या मदतीने गोळा करा.
2. संदीप खरे यांचे 'दमलेल्या बाबाची कहाणी' हे गाणे ऐका.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED



## चला थोडे हसूया

### मेहनती

वडील - संजू, तुझ्या वर्गात सर्वात मेहनती कोण आहे?

संजू - मीच, पप्पा!

वडील - ते कसं काय ?

संजू - बाकीची मुले तासाला वर्गात बाकावर बसलेली असतात.
मी एकटाच नेहमी उभा असतो.

# 17 आगगाडी व जमीन

L6B1S3

**- कुसुमाग्रज**

**परिचय :**

विष्णू वामन शिरवाडकर (1912 - 1999) 'कुसुमाग्रज' या टोपण नावाने ओळखले जातात प्रतिभासंपन्न मानवतावादी कवी, 'जीवनलहरी', 'विशाखा', 'किनारा', मराठीमाती हे काव्यसंग्रह प्रसिद्ध. वैष्णवी, कल्पनेच्या तीरावर, जान्हवी या कादंबऱ्या प्रसिद्ध आहेत. दूरचे दिवे, दुसरा पेशवा, कौंतेय, नटसम्राट ही नाटके प्रसिद्ध. साहित्य क्षेत्रातील सर्वोच्च 'ज्ञानपीठ पुरस्कार' त्यांना मिळालेला आहे. (1987)

बलवानांनी दुर्बलांवर सत्ता गाजवणे हे तर नेहमी घडत आले आहे. पण जेव्हा अन्यायाचा अतिरेक होतो तेव्हा सत्ता उलथून टाकली जाते. हेच आगगाडी आणि जमीन ही प्रतिके घेऊन कुसुमाग्रजांनी या कवितेतून दर्शविले आहे. ही कविता 'विशाखा' या कविता संग्रहातून निवडली आहे.

**(मूल्य-गर्वहरण)**



नको ग! नको ग!
आक्रंदे जमीन
पायाशी लोळत
विनवी नमून -

धावसी मजेत
वेगात वरून
आणिक खाली मी
चालले चुरून!

छातीत पाडसी
कितीक खिंडारे
कितीक ढाळसी
वरून निखारे!

नको ग! नको ग!
आक्रंदे जमीन
जाळीत जाऊ तू
बेहोष होऊन.

ढगात धुराचा
फवारा सोडून
गर्जत गाडी ती
बोलली माजून -

दुर्बळ! अशीच
खुशाल ओरड
जगावे जगात
कशाला भेकड!

पोलादी टाचा या
छातीत रोवून
अशीच चेंदत
धावेन ! धावेन!

चला रे चक्रांनो,
फिरत गरारा
गर्जत पुकारा
आपुला दरारा!

शीळ अन कर्कश
गर्वात फुंकून
पोटात जळते
इंधन घालून !

शिरली घाटात
अफाट वेगात
मैलांचे अंतर
घोटात गिळीत !

उद्दाम गाडीचे
ऐकून वचन
क्रोधात इकडे
थरारे जमीन

''दुर्बळ भेकड!''
त्वेषाने पुकारी
घुमले पहाड
घुमल्या कपारी!

हवेत पेटला
सूडाचा धुमारा
कोसळे दरीत
पुलाचा डोलारा!

उठला क्षणार्ध
भयाण आक्रोश
हादरे जंगल
कापले आकाश

उलटी पालटी
होऊन गाडी ती
हजार शकले
पडली खालती!

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

## नवीन शब्दार्थ :

आक्रंदणे - रडणे, आकांत करणे
विनवी - विनंती करते
निखारे - विस्तव, इंगळ, अंगार
खिंडार - भगदाड, बोगदा
माजून - गर्वाने
दुर्बळ - अशक्त

भेकड - भित्रा
इंधन - सरपण, जळण
कर्कश - कर्णकठोर, कानठळ्या बसविणारे
उद्दाम - उग्र, बेफाम
क्रोध - राग, संताप
पहाड़ - डोंगर
कपारी - खबदडी, डोंगरातील खोलगट जागा
सूड - बदला
डोलारा - पुलाचे बांधकाम
शकले - तुकडे
टाच - पायाची खोट (कवितेतील अर्थ - गाडीची चाके)
भयाण - भीतीदायक
आक्रोश - आकांत, कल्लोळ
दरारा - भीती, दहशत
चेंदत - तुडवीत
नमून - वाकून, नम्र होऊन
थरारे - थरथर कापते
घाट - डोंगरातून जाणारी वळणाची वाट
त्वेष - संताप, आवेश, अवसान
बेहोष होणे - शुद्ध नसणे
धुमारा पेटणे - आग पेटणे, राग अनावर होणे
ढाळणे - टाकणे
चुरून जाणे - चुरगाळणे, दबून जाणे

**टिपा :**

आगगाडी - पूर्वी वाफेच्या शक्तीवर चालणारे इंजिन होते. त्यासाठी दगडी कोळसा पेटवून त्याच्या उष्णतेवर पाणी गरम करीत. त्याच्या वाफेच्या शक्तीवर इंजिन चालायचे.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## अभ्यास

**प्र.1. खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

1. जमीन कुणाला विनवणी करत आहे?
2. गर्वाने माजून गाडी जमिनीला उद्देशून काय बोलते?
3. जमीन क्रोधाने का थरथरते?
4. गाडी आपल्या चक्रांना काय म्हणते ?
5. आगगाडी जमिनीवर काय ढाळत आहे?

**प्र.2. खालील प्रश्नांची दोन - तीन वाक्यात उत्तरे लिहा.**

1. आगगाडीच्या घमेंडीत बोलण्याचा कोणता परिणाम झाला?
2. आगगाडी जमिनीला कशाप्रकारे त्रास देत आहे?

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**प्र.3. खाली दिलेल्या चौकोनातील व गोलातील समानार्थी शब्दांच्या जोडया जुळवा.**

निखारा, दुर्बळ
क्रोध, जमीन,
जंगल, भेकड

विस्तव भूमी, अरण्य
भित्रा, अशक्त, राग

1. निखारा - ____________________
2. दुर्बळ - ____________________
3. क्रोध - ____________________
4. भेकड - ____________________
5. जमीन - ____________________
6. जंगल - ____________________

**प्र.4. या कवितेच्या आधारे खाली दिलेल्या कंसातील योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागी लिहा.**

1. नको ग ! नको ग! आक्रंदे जमीन
   पायाशी लोळत ______________
   (विनवी नमून, रडे ढळाढळ, हसे खुदकन)

2. धावसी वेगात मजेत वरून
   आणिक खाली मी ______________
   (झोपते शांत, चालले चुरून, हसते खुलून)

3. छातीत पाडसी कितीक खिंडारे
   ______________ वरून निखारे
   (आणिक ढाळताती, कितीक ढाळसी, थंड होती आणि)

4. नको ग! नको ग! आक्रंदे जमीन
   जाळीत जाऊ तू ______________
   (हासली लाजून, बेहोश होऊन, ऊर माझा)

5. ढगात धुराचा फवारा सोडून
   गर्जत गाडी ती ______________
   (हासली लाजून, बोलली माजून, धावत सुटली)

**प्र.5. विशेष्य (नाम) व विशेषण यांच्या जोड्या जुळवा.**

| **प्रश्न** | | | | **उत्तरे** | |
|---|---|---|---|---|---|
| | **'अ' गट** | | **'ब' गट** | **'अ' गट** | **'ब' गट** |
| 1. | धुराचा | (अ) | टाचा | ______ | ______ |
| 2. | पोलादी | (आ) | वेग | ______ | ______ |
| 3. | कर्कश | (इ) | आक्रोश | ______ | ______ |
| 4. | अफाट | (ई) | फवारा | ______ | ______ |
| 5. | भयाण | (उ) | शीळ | ______ | ______ |

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## उपक्रम:

1. 'आगगाडी व जमीन' यांच्यातील संवाद शिक्षकांची मदत घेऊन लिहा.
2. कुसुमाग्रजांची नाटके मिळवून वाचा.

### वाचा

**यासाठी कोणता शब्द वापरतात ते लक्षात घ्या. रिकाम्या चौकटींत योग्य अक्षरे लिहून ते शब्द पूर्ण करा.**

१. भित्रा प्राणी.
२. रस्ता या शब्दाला पर्यायी शब्द.
३. उन्हाळ्यात पितात.
४. चौघडा या वाद्यबरोबर येणारे दुसरे वाक्य.
५. उत्सव या अर्थाचा दुसरा शब्द.

| | | | |
|---|---|---|---|
| स | | | |
| स | | | |
| स | | | |
| स | | | |
| स | | | |

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

### वाचा

**चौकटींत अक्षरे लिहून तो शब्द पूर्ण करून कोडे सोडवा.**



| १ दा | २ क | ३ झ | ४ झु | ५ न | ६ ह | ७ फू | ८ चि | ९ डे | १० टि | ११ मो |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |

१. मोठ्या भावाला म्हणतात.
२. ज्वारीची वाळलेली धाटं, वैरण.
३. झुळझुळ वाहणारा.
४. वाऱ्याची मंद मंद वाहणारी.
५. डोंगरात उगम पावणारी.
६. हे भरडण्यासाठी जाते वापरतात.
७. वेलीवर उमलणारे.
८. सुट्या पैशांना म्हणतात.
९. गाडगेबाबांचे लहानपणीचे नाव.
१०. पडघमवर वाजवतात ती.
११. थुईथुई नाचणारा.



चित्र क्र. 1



चित्र क्र. 2

- वरील चित्रे नीट पहा. तो प्रसंग ओळखून त्या प्रसंगाचे वर्णन लिहा.
- चित्रातील व्यक्ती एकमेकाशी काय बोलत असतील ते कल्पना करुन लिहा.

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

# माहिती घ्या



NOT TO BE REPUBLISHED

- तुमच्या घरी कोणकोणते सण साजरे करतात ? तुम्हांला कोणता सण जास्त आवडतो ? त्या सणाचे वर्णन करा. **वर्णनासाठी प्रश्न** - सणाचे नाव काय ? यावर्षी तो कोणत्या महिन्यात आहे ? त्या सणाची तयारी घरात कशी करतात ? कोण काय काय करते ? या सणाला तुमच्या घरी कोण कोण येते ? तुम्हांला हा सण का आवडतो ? वर्णन लिहा व वर्गात वाचून दाखवा.
- वर्गमित्रांकडून त्यांच्या घरी साजऱ्या केलेल्या सणाचे रीतिरिवाज माहीत करून घ्या.
- ईद, नाताळ असे विविध सण कसे साजरे करतात याची माहिती मिळवा. वहीत लिहा.

18

# ज्योत

- वि.म. कुलकर्णी

P5G8Y2

**परिचय :**

विनायक महादेव कुलकर्णी (1917 - 2010) सांगली जिल्ह्यातील 'मणेराजुरी' येथे जन्म. शिक्षण - एम्.ए., पी.एच्.डी प्रारंभी बेळगावमधील लिंगराज कॉलेजमध्ये प्राध्यापक नंतर सोलापूरच्या 'दयानंद कॉलेज' मध्ये मराठी विभाग प्रमुख म्हणून सेवानिवृत्त.

पहाटवारा, विसर्जन, कमळवेल, अश्विनी हे कवितासंग्रह तसेच बालगीतसंग्रह प्रसिद्ध आहेत. गदिमा पुरस्कार, कविश्रेष्ठ भा. रा तांबे पुरस्कार, दिनकर लोखंडे बाल साहित्यिक पुरस्कार प्राप्त. ही कविता 'आठवणीतल्या कविता - भाग 2' या पुस्तकातून निवडली आहे.

**(मूल्य - परोपकार)**

आधी होते मी दिवटी
शेतकऱ्याची आवडती
झाले इवली मग पणती
घराघरांतून मिणमिणती ।। 1 ।।



@KTBS NOT TO BE REPUBLISHED



समई केले मला कुणी
देवापुढती नेवोनी,
निघुनी आले बाहेर
सोडीत काळासा धूर ।। 2 ।।

कांचेचा मग महाल तो
कुणी बांधुनी मज देतो
कंदील त्याला जन म्हणती
मीच तयांतील परि ज्योती ।। 3 ।।





बत्तीचे ते रूप नवे
पुढे मिळाले मज बरवे
वरात मज वाचून अडे
झगझगाट तो कसापडे ।। 4 ।।



आता झाले मी बिजली
घरे, मंदिरे लखलखली
देवा ठावूक काय पुढे
नवा बदल माझ्यात घडे ।। 5 ।।



एकच ठावे काम मला
प्रकाश द्यावा सकलांना,
कसलेही मजरूप मिळो
देह जळो अन् जग उजळो ।। 6 ।।

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

## नवीन शब्दार्थ :

दिवटी - लहान मशाल
मिणमिणती - मंदपणे जळणारी
इवली - छोटीशी
समई - ठाणवई, देवासमोर अखंड जळणारा लावलेला दिवा (नंदादीप)
महाल - राजवाडा, प्रशस्त इमारत
जन - लोक
बत्ती - वात, दिवा (पूर्वीच्या काळी लग्नाच्या वरातीत गॅसबत्ती लावत असत)
बरवे - सुंदर
झगझगाट - प्रखर प्रकाश

| | | |
|---|---|---|
| बिजली | - | वीज |
| सकलांना | - | सगळ्यांना |
| देह | - | शरीर |
| मज | - | मला |
| उजळो | - | प्रकाशमान होवो |
| ठावे | - | ठावूक असणे, माहीत असणे |
| अडणे | - | खोळंबणे, अडचण येणे |
| काळासा | - | काळा |
| वरात | - | लग्नानंतर नवरानवरीची काढलेली मिरवणूक |

## अभ्यास

**प्र.1. खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

1. दिवटी कोणाची आवडती होती?
2. वरात कशावाचून अडते?
3. बिजलीमुळे कोणता बदल झाला?
4. घराघरातून कोण मिणमिणते?
5. दिव्याला कोणते एकच काम ठाऊक आहे?

**प्र.2. खालील प्रश्नाचे दोन - तीन वाक्यात उत्तर लिहा.**

1. कवितेच्या अखेरीस ज्योत कोणती इच्छा व्यक्त करते?

**प्र.3. खालील प्रश्नाचे पाच - सहा वाक्यात उत्तर लिहा.**

1. ज्योतीची कोणकोणती रूपे कशी बदलत गेली ते लिहा.

**प्र.4. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

1. झाले मग ______________________ पणती.
2. ______________________ त्याला जन म्हणती.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

3. ______________________ ते रूप नवे.

4. नवा ______________________ माझ्यात घडे.

5. देह जळो अन् ______________________ उजळो.

**प्र.5. खालील ओळी कोणी म्हटल्या आहेत?**

1. शेतकऱ्याची आवडती ______________________

2. काचेचा मग महाल तो ______________________

3. आता झाले मी बिजली ______________________

4. निघुनी आले बाहेर ______________________

**प्र.6. पुढील शब्दांचे समानार्थी शब्द खाली दिलेल्या कंसातून शोधून लिहा.**

**(सर्व, वीज, छोटीशी, उजेड, शरीर, जन)**

1. सकल ______________ 4. देह ______________

2. प्रकाश ______________ 5. बिजली ______________

3. इवली ______________ 6. लोक ______________

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**प्र.7. पुढील शब्दांचे विरुध्दार्थी शब्द लिहा.**

1. उजेड ______________ 4. उजळणे ______________

2. रात्र ______________ 5. आवडती ______________

3. देव ______________

**उपक्रम:**

1. पणती, दिवटी व समई यांची चित्रे काढा व रंगवा.

2. शिक्षकांच्या मदतीने 'ज्योतीचे आत्मवृत्त' लिहा.

# शब्दसमूहासाठी एक शब्द

| | | |
|---|---|---|
| 1. | बालापासून वृध्दांपर्यंत | - आबालवृध्द |
| 2. | लहानग्यांना झोपविण्यासाठीचे गाणे | - अंगाईगीत |
| 3. | जिवाला जीव देणारा | - जिवलग |
| 4. | चार रस्ते येतात ती जागा | - चौक, चव्हाटा |
| 5. | दररोज प्रसिध्द होणारे | - दैनिक |
| 6. | पुरामुळे नुकसान झालेले लोक | - पूरग्रस्त |
| 7. | मोफत पाणी मिळण्याची सोय | - पाणपोई |
| 8. | गावातील एकत्र पाणी भरण्याची जागा | - पाणवठा |
| 9. | डोंगर पोखरून आरपार केलेला रस्ता | - बोगदा |
| 10. | दगडावर कोरलेला लेख | - शिलालेख |
| 11. | दोन नद्या एकत्र मिळण्याची जागा | - संगम |
| 12. | देशासाठी प्राणार्पण केलेला | - हुतात्मा |
| 13. | दररोज ठरलेला कार्यक्रम | - दिनक्रम, दिनचर्या |
| 14. | स्वत:चा फायदा न पाहणारा | - नि:स्वार्थी |
| 15. | पहाटे पूर्वीची वेळ | - उष:काल |
| 16. | फुकट जेवण मिळण्याचे ठिकाण | - अन्नछत्र |
| 17. | सभेत भाषण करणारा | - वक्ता |
| 18. | स्वत:बद्दल अभिमान असणारा | - स्वाभिमानी |
| 19. | स्वत:ची वस्तू कोणालाही सहज देणारा | - उदार, दिलदार |
| 20. | देवळातील मूर्तीजवळचा आतील भाग | - गाभारा, गर्भगृह |

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

# पत्र लेखन

**कौटुंबिक पत्र:**

आपला अभ्यास कसा चालला आहे ते पत्राने मित्रास कळवा.

दि : 21/10/2022

प्रेषक,

साईराज पाटील,
125, 'मातोश्री'
मंगळवार पेठ,
बेळगावी,
पिन - 590010.

प्रिय मित्र शौर्य यास,

सप्रेम नमस्कार वि. वि.

कालच तुझे पत्र मिळाले. इकडे सर्व ठीक आहे. माझा अभ्यास जोरात चालू आहे. पुढच्या आठवडयात माझी सहामाही परीक्षा सुरू होईल. या वेळेस पहिला नंबर मिळविण्याचा माझा प्रयत्न चालू आहे.

दसरा सुट्टीत पप्पांबरोबर बेंगलोरला फिरायला येणार आहे. तुझा अभ्यास कसा चालला आहे ते कळव वरचेवर पत्र पाठव. तुझ्या आईवडिलांना व आजीआजोबांना नमस्कार सांग. लहानांना आशीर्वाद.

कळावे,

तुझा मित्र

साईराज

**प्रति,**
शौर्य देसाई,
शिवाजीनगर,
बेंगलोर,
पिन - 560001.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

# रजा अर्ज

दि : 20/11/2022

प्रेषक,
कु. मानसी पाटील,
वर्ग-आठवी,
रोल नं. 04,
सरकारी माध्यमिक विद्यालय,
बेळगावी,
पिन : 590010.

प्रति,
मा. वर्गशिक्षक,
वर्ग आठवी,
सरकारी माध्यमिक विद्यालय,
बेळगावी,
पिन : 590010.

विषय: तीन दिवसांची रजा मिळणेबाबत...

महोदय,

मी मानसी विठ्ठल पाटील आपणास या अर्जाद्वारे विनंती करते की माझ्या भावाचे लग्न दि. 23/11/2022 रोजी असल्यामुळे मी दि. 22/11/2022 ते 24/11/2022 या कालावधीत शाळेत हजर राहू शकत नाही. माझ्या गैर-हजेरीतील झालेला अभ्यास मी पूर्ण करेन. तरी कृपया मला वरील तीन दिवस रजा मंजूर करावी.

ही नम्र विनंती.

कळावे,

(सही)
आपली आज्ञाधारक
मानसी पाटील

स्थळ - बेळगावी
दि. 20/11/2022

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

# ओळख तंत्रज्ञानाची



1. नमस्कार, विद्यार्थी मित्रांनो! ओळखलतं का मला? मी आहे तुमचा आवडला संगणक (computer). माझ्याबद्दल मी तुम्हाला काही सांगणार आहे. प्रारंभी माझा आकार मोठ्या खोली एवढा होता. अॅबैकस (abacus) हे माझे पहिले स्वरूप. गणिते करण्यासाठी माझा जन्म झाला. चार्लस् बॅवेज याने मला तयार केले.




2. त्यानंतर नेपियर बोन, पास्कलाईन लिबनिजव्हील, डिफरन्स इंजिन, अॅनालिटिकल इंजिन, टैबलेटिंग मशीन, डिफरन्स अॅनालायझर असे माझे स्वरूप बदलत गेले. 1944 मध्ये हार्वर्ड यांनी IBM कंपनीसोबत मिळून 'मार्क 1' ची निर्मिती केली आणि माझे आधुनिक रूप जगासमोर आले.

3. 1981 मध्ये 'ओसबोर्न कॉम्प्युटर कार्पोरेशनने' पहिला इलेक्ट्रॉनिक पोर्टेबल कॉम्प्युटर तयार केला.

4. विद्यार्थी मित्रांनो! माझे कार्यक्षमतेच्या आधारे वेगवेगळे प्रकार पडतात.

   1. एनालॉग संगणक
   2. डिजिटल संगणक
   3. संकरित संगणक
   4. सुपर संगणक
   5. मेनफ्रेम संगणक
   6. मिनी संगणक
   7. मायक्रो संगणक

5. मित्रांनो! माझे दोन प्रमुख भाग आहेत.

   (अ) हार्डवेअर - माझ्या ज्या भागांना तुम्ही प्रत्यक्ष स्पर्श करू शकता त्यांना 'हार्डवेअर' असे म्हणतात.

   (ब) सॉफ्टवेअर - माझ्या ज्या भागांना तुम्ही प्रत्यक्ष स्पर्श करू शकत नाही त्यांना 'सॉफ्टवेअर' म्हणतात.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

माझ्या प्रत्येक भागाचे कार्य वेगवेगळे असते.

* जसे संगणकाला इनपुट देणे.
* युजरला आऊटपुट दर्शविणे.
* स्टोअरेज डिव्हाईसमध्ये माहिती साठवणे.
* माहितीवर प्रक्रिया करणे.

माझे सर्व पार्टस् ऑपरेटिंग सिस्टीमद्वारे एकमेकांना जोडलेले असतात.

**6. आज माझी विविध रूपे तुम्हाला पहायला मिळतात.**

(अ) डेस्कटॉप




(ब) लॅपटॉप



(क) टॅबलेट



(ड) स्मार्टफोन



@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

**7. माझ्या भागांचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करता येईल.**

**(अ) इनपुट डिव्हाईस**

(i) माऊस



(ii) की बोर्ड



(iii)वेब कॅमेरा




(iv) मायक्रोफोन



## 8. आऊटपुट डिव्हाईस

(i) मॉनिटर




(ii) प्रिंटर




(iii) प्रोजेक्टर



(iv) स्पीकर



@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

तर मित्रांनो, माझ्या बद्दलची ही ओळख तुम्हाला कशी वाटली? आवडली ना!

# खरा देव

- आबासाहेब घावटे



©KTBS NOT TO BE REPUBLISHED

पोळ्याचा सण होता. चंदू सकाळी लवकर उठला. बाबांबरोबर नदीवर गेला बैल, गायी स्वच्छ धुवून आणल्या. त्यांच्या शिंगांना सुंदर रंग लावला. त्यावर बेगडपट्ट्या चिकटवल्या. बैलांच्या गळ्यात चंगाळी बांधली. कवड्यांच्या व मण्यांच्या माळा त्यांच्या गळ्यात घातल्या. शिंगांना रेशमी गोंडे बांधले. त्यांच्या अंगावर सुंदर चित्रे काढली. बैलांना अगदी छान सजवले. चंदूने एका वाटीत चुना कालवला. एक ब्रश घेतला. गोठ्याच्या भिंतीवर सुंदर चित्रे काढली. आंब्यांच्या पानांचे तोरण दारावर बांधले. सायंकाळी बैलांची पूजा होती. त्यासाठी लागणारे साहित्य गोळा केले. फुगे आणले. बैलांच्या अंगावर घालावयाच्या झुली व्यवस्थित करून ठेवल्या. देवांना फोडावयाचे नारळ सोलले...

सणाचा दिवस, चंदुची आईहीं लवकर उठली, झाडलोट लकर केली सडासारवण केलं. दारात सुंदर रांगोळी काढली दात देवाची पूजा केली पुरणपोळीचा स्वयंपाक तयार केला कुरवडया, पापड, भजी तळून घेतले. भात आमटी, गुळवणी तयार केले. देवासाठी नैवस्य बनवले.

एका ताटात पुरणपोळीचा नैवेद्य भरला. छोटे छोटे नैवेद्यही त्यात ठेवले. त्यावर सगळे पदार्थ ठेवले. सोबत पाण्याचा तांब्या उदबत्ती, नारळ, हळदीकुंकू सारे दिले. ते नैवेद्याचे ताट घेऊन चंदू देवाला निघाला. "आगोदर देवाला नैवद्य, मगच घरातील सगळ्यांना जेवण." चंदूची

आई म्हणाली. त्याच्या गावात विठ्ठल - रुक्मिणी मंदिर होते. हनुमानाचे होते, तसेच खंडोबाचे व ज्योतिबाचेही होते. ज्योतिबाचं मंदिर गावापासून थोडं दूर होतं. पहिल्यांदा तिकडच जावं पुन्हा गावात यावं, असं चंदूने ठरवलं.

तो गावाबाहेर आला. ज्योतिबाच्या मंदिराकडे जाण्यासाठी पाऊलवाट होती. त्या वाटेने तो निघाला. वाटेतील झाडं त्यांच्या कडे पहात होती. त्यांची फुलं गालातल्या गालात हसत होती. पाखरे गाणी म्हणत होती, ज्योतिबाचं मंदिर आलं. मंदिराच्या शेजारी वडाचं मोठ्ठ झाड होतं. त्याच्या सावलीत कुणीतरी बसल्याचं चंडुला दिसलं. त्याला वाटलं असेल मंदिराचा पुजारी चंदू त्याच्या जवळ गेला. पाहतो तर दुसरं कुणीतरी. त्याच्या अंगावरील कपडे फाटलेले, केस वाढलेले, अंगाला जखमा झालेल्या, अंथरुण नाही, पांघरूण नाही. एकटाच बसलेला. भुकेलेला, तहानलेला,....



चंदू त्याच्या जवळ गेला. त्याची विचारपूस केली. तो एकटाच होता. मंदिर हेच त्यांचं घर होतं. तिथंच आडोशाला झोपायचा, कुणी काही दिलं तरचं खायला. काही नसल्यास नुसतं पाणी पिऊन रहायचा, अंगावर-च्या जखमा वाहत होत्या. त्याला खूप वेदना होत होत्या. तो खूप थकला होता. डोळे आभाळ गळाल्यासारखे गळत होते.

चंदूला त्याची दया आली. इथं तर कुणी नाही. पुजारीही रोज येत नाही. गावकरीही सणासुदीलाच येथे येतात. किती अवघड आहे याचे जीवन. तो मनाशी पुटपुटला. त्याला खूप वाईट वाटले. देव खरंच आहे का?. खरा देव माणसातंच आहे. भुकेलेल्या ला अन्न दयाव तहानलेल्याला पाणी दयावं पशू. पक्ष्यांना प्रेम द्यावं, दीन दुबळ्यांना मदत करावी. दु:खितांची आसवे पुसातीत आईही नेहमी सांगते. "चंदू माणसातच खरा देव आहे. त्यांची सेवा करत जा." आपण देवाला नैवेद्य आणला आहे, तो आता यालाच द्यायला हवा. त्याला खूप भूक लागलेली आहे. तो उपाशीच

आहे. त्याची तेवढीच भूक भागेल,. देवालाही ते आवडेल,. चंदू ताट पूढे करत म्हणाला, "दादा, ही घे मी तुझ्यासाठी पुरणपोळी आणली आहे."

"देवाच्या नैवेद्यासाठी आणलेलं मला कशाला?" हळूवार आवाजात तो बोलला.

"तूच खरा देव असताना मी दूसरा देव शोधायला कोठे जाऊ ?" चंदूचे शब्द ऐकले तसे त्याच्या डोळ्यात पाणी आलं

“आम्ही गरीब, पोट भरायला महाग, आम्ही कसले देव ?”

"होय दादा, तूच खरा देव आहेस. देव देवळात राहत नाही. माणसातच राहतो. माणसांची सेवा करणाऱ्यांना तो भेटतो."

"बाळा, किती चांगला आहेस तू ! कुठे शिकलास रं तू हे ?"

"तू जेव आधी मग सांगतो", त्याने तो नैवेद्य खाल्ला. पुरणपोळी खाल्ली. तांब्यातील पाणी प्याला. त्याला जरा हुशारी आली. त्याने चंदूला आशीर्वाद दिला. आनंदाने चंदू घरी परतला.

घरी आल्यावर तो आईला म्हणाला, "आई, देवाने आज माझ्या हातची पुरणपोळी खाल्ली. त्यानं मला रोज सकाळी नैवेद्य घेऊन यायला सांगितलय देशील का गं करून?"

आईला आश्चर्य वाटलं. देव कसा मागेल ? तिने चंदूला विचारले. चंदूनं घडलेला सगळा प्रसंग सांगितला. आईनं त्याला जवळ घेतलं, त्याच्या पाठीवरून मायेनं हात फिरवत आई म्हणाली, "चंदू आज तू खऱ्या देवाला नैवेद्य दाखविलास या पुढही अशाच देवाची पता खरा देव माणसातच असतो. पूजा करते जा

“आई मी रोज जाईन या देवाकडे. पण तू देशील ना नैवेद्य करून?”

“होय, बाळा तू रोज आधी ला माणसाला जेवण देत जा. मग तिथून तुझी- तिथून तुझी शाळा जवळच आहे.

होय आई, नक्की जाईन.

“चंदू, तू खरचं गुणी मुलगा आहेस. अशी गुणी मुळे सगळ्यांनाच आवडतात. तू खूप शीक, मोठा हो, स्वत:साठी नव्हे तर या गोर गरिबांसाठी!” आई बोलत होती. चंदू ते आपल्या मनाच्या गाभायानो गाभाऱ्यात साठवून ठेवत होता.

@KTRS NOT TO BE REPUBLISHED

# सांगा पाहू ?



वरील चित्राचे निरीक्षण करा. आणि खालील प्रश्नांची उत्तरे चौकोनात लिहा.

1) बैलगाडीत किती माणसे आहेत ?

2) बैलगाडीत काय भरले आहे?

बैलगाडी कोठे निघाली असावी ?

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

# वाढदिवस

- अनुराधा फाटक

आज संध्याकाळी रवीचा वाढदिवस म्हणून सकाळपासूनच रवीच्या आईची गडबड सुरू होती. रवी त्यांचा एकुलता एक मुलगा होता. परमेश्वराने त्याच्यावर सर्व दृष्टीने वरदहस्त ठेवला होता. लक्ष्मीच्या कृपादृष्टीचा तर प्रश्नच नव्हता.

अशा वातावरणात वाढलेल्या रवीचा वाढदिवस म्हणजे मोठाच समारंभ होता तो! घरातील नोकर-चाकरसुद्धा कामात गुंतले होते. रवीने आपल्या वर्गातील सर्व मित्रांना वाढदिवसानिमित्त बोलावले होते. रवी वर्गात तसा सर्वांचाच लाडका होता. त्याच्याकडे केवळ ऐश्वर्य नव्हते तर लक्ष्मीबरोबर सरस्वतीही तेथे नांदत होती. त्यामुळं वर्गातल्या सर्व मित्रांना, शिक्षकांना त्याचे कौतुक वाटत असे.

खास वाढदिवसानिमित्त रवीने आई-वडिलांकडून नवा ड्रेस मिळविला होता. त्याच्या आत्याने त्याला अमेरिकेहून घड्याळ पाठविल होते. तर मावशीने नवीन पद्धतीचा मॅकॅनो सेट त्याच्या पसंतीनेच खरेदी केला होता. मामा त्याला बरीच गोष्टीची पुस्तके देणार होता.

एकंदरीत रवीचा वाढदिवस म्हणजे एखाद्या युवराजाचाच वाढदिवस असावा असा थाट होता. त्याच्या आईने-ललितादेवींनी आपल्या मंडळातील झाडून सर्व बायकांना बोलावले होते. इतरांच्यापेक्षा आपल्या मुलाच्या वाढदिवसाच्या नाविन्यांचे प्रदर्शन करण्याची संधी त्या सोडणार नव्हत्या. त्याच्या बाबांनीही हाच विचार करून आपला सर्व स्टाफ संध्याकाळी बोलावला होता.

संध्याकाळी चारच्या सुमारास घरातील सर्व आवरून ललितादेवी बंगल्याबाहेर आल्या. बंगल्याबाहेरच्या लॉनवर नोकर संध्याकाळच्या कार्यक्रमाची तयारी करत होते. मेजवानीचा मुख्य कार्यक्रम बाहेरच्या लॉनवरच होता. भारतीय संस्कृतीप्रमाणे औक्षण करणे आणि पाश्चिमात्त्य संस्कृतीप्रमाणे केक कापणे या दोन्ही कार्यक्रमांचे आयोजन मात्र एकाच हॉलमध्ये करण्यात आले होते. जणूकाही विद्याधरपंतांच्या घरात पौर्वात्य आणि पाश्चिमात्त्य संस्कृती हातात हात घालून नांदत असल्याचेच त्यांना सूचित करावयाचे होते.

संध्याकाळचे सहा वाजले आणि सनईच्या मंगलसुराने व रंगीबेरंगी दिव्यांच्या मंद प्रकाशाने तेथील वातावरण गजबजून गेले. निमंत्रितांच्या आगमनाला सुरुवात झाली. विद्याधरपंतांनी आपल्या स्टाफची एका बाजूला. तर ललितादेवींनी आपल्या मंडळाची दुसऱ्या बाजूला व्यवस्था केली होती. रवीचे मित्र मात्र समोरच्या लॉनवरच थांबणार होते.

हळूहळू बंगल्याचे प्रशस्त आवार गजबजून गेले. वातावरणाला एका भव्य सोहळ्याचे स्वरूप प्राप्त झाले. आई-वडिलांच्या, मित्र-मैत्रिणींबरोबर रवीचे मित्रही जमू लागले. हास्य-विनोदाचे फवारे उडू लागले.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

जवळ जवळ सर्व निमंत्रित आल्याचे लक्षात येताच कार्यक्रम सुरू करण्याचे ठरले. पण रवीची नजर मात्र सभोवार भिरभिरत होती. त्याचे सर्व मित्र आले होते. पण सर्वात प्रिय मित्र अतुल मात्र आला नव्हता. रवी त्याची उत्कंठतेने वाट पाहात होता. इतरांच्यापेक्षा कितीतरी वेळा आणि कितीतरी आग्रहाने त्याने अतुलला निमंत्रण दिले होते. त्याच्या स्वाभिमानी मनाला समाधान मिळावे म्हणून रवीने त्याच्या घरी जाऊन त्याच्या आईची परवानगीही मिळविली होती. त्यामुळे एवढ्या मोठ्या समारंभात सर्व विसरून रवीची नजर अतुलला न शोधेल तरच नवल.

जवळ जवळ साडेसात वाजत आले. रवीच्या आई वडिलांनी रवीला कार्यक्रमास सुरुवात करण्यास सांगितले. थोड्याशा हिरमुसल्या अवस्थेतच रवीने होकार दिला. कार्यक्रम सुरू झाला. औक्षण करणे, केक कापणे सर्व कार्यक्रम पार पडले. वाढदिवसानिमित्त रवीला मिळालेल्या भेटवस्तूंचा ढीग पडला होता. प्रत्येकाने आपल्या इभ्रतीला शोभेल आणि रवीच्या आई-वडिलांकडून कौतुक होईल अशाच भेटवस्तू आणल्या होत्या.

भोजनाचा कार्यक्रम संपवून सर्वजण परतू लागले. रवीनेही आपल्या मित्रांना नोकरांच्या मदतीने त्यांच्या घरी पोचविण्यास सुरुवात केली. सर्व आवराआवर करून नोकर मंडळी निघण्याच्या तयारीत होती.

रवीने नवीन कपडे उतरवून झोपण्याचा पोशाख चढविला. त्याच्या मनातील अतुल संबंधीचे विचार जात नव्हते. 'का आला नसेल अतुल ? त्याच्या आईने त्याला पाठविले नसेल का ?' विचार करत करतच तो झोपला.

घरातला सर्वात जुना नोकर रामू बंगल्याच्या फाटकाला कुलूप लावण्यासाठी गेला. तेव्हा त्याला त्या अंधारात कुणीतरी उभं असल्याचं लक्षात आलं! त्यानं दिवा लावला व विचारलं,

"कोण रे तू?"

“मी अतुल. रवीचा मित्र! रवी आहे का ?" रामूने त्याला आपल्या बरोबर बंगल्यात आणले.

"अहो रवीबाबू, तुमच्याकडं कोण आले ते बघा!" असं म्हणून त्यानं रवीला हाक मारली. नुकताच डोळा लागलेल्या रवीला रामूच्या हाकेने जाग आली. डोळे चोळतच तो बाहेर आला. पाहातो तो समोर अतुल!

अत्यानंदानं उडी मारून रवीने त्याचा हात धरला. "संध्याकाळी का नाही रे आलास ?” थोड्याशा नाराजीने रवीने विचारले. अतुलचे डोळे भरून आले. रवी गोंधळला.

“आई रागावली का?"

“नाही !”

“मग काय झालं? रडू नकोस!" असं म्हणत रवीनं अतुलच्या पाठीवर हात ठेवला.

थोडासा हुंदका आवरून अतुल म्हणाला,

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

“रवी, तू बोलावलंस. खूप आनंद झाला, पण... तुला वाढदिवसानिमित्त देण्यासारखं माझ्याजवळ काहीच नव्हतं! सगळे मित्र तुला चांगल्या चांगल्या भेटवस्तू आणणार आणि मी मात्र...!” असं म्हणत असतानाच अतुलच्या डोळ्यांतून धारा वाहू लागल्या. रवीलाही क्षणभर काय बोलावं ते कळेना.

“अरे, भेटवस्तू म्हणजे प्रेम नव्हे! चल, आपण आई-बाबांच्याकडे जाऊ.” असं म्हणत रवीनं त्याचा हात धरला.

“थांब रवी!” म्हणत अतुलनं आपल्या खिशात हात घातला आणि छोटासा रुमाल रवीसमोर धरला.

"ही माझी वाढदिवसानिमित्त भेट! ताईच्या फ्रॉकचे थोडे कापड मिळाले. त्याचा मी स्वत: रुमाल तयार केला." अतुलच्या डोळ्यांतून पाणी ओघळत होते. रवीलाही आपल्या डोळ्यांतील अश्रू लपविता आले नाहीत.

“रवी, अरे रवी, कोणाशी बोलतो आहेस?" असं म्हणत रवीची आई बाहेर आली.

'आई, हा माझा प्रिय मित्र अतुल !”

'आई, हा किती वेडा आहे बघ. वाढदिवसाची भेट देता आली नाही म्हणून रडतो आहे.” असं सांगताना रवीचे डोळेही डबडबले होतेच!

“अतुल, अरे आमचा रवी तसाच तू! भेटवस्तूने का मैत्री होते ? तुझे सद्गुण- ज्यामुळे रवीने तुझ्याशी मैत्री केली तीच त्याला तुझ्याकडून मिळालेली खरी भेट आहे.” असं म्हणत त्यांनी पदरानं आपले डोळे पुसले.

"यापुढं आमच्याकडं नेहमी यायचं! अडचण सांगायची. दोघं खूप शिका. मोठे व्हा!” म्हणत ललितादेवींनी दोघांना पोटाशी धरलं!

@KTBS NOT TO BE REPUBLISHED